cmyk

## संपादकीय

### वेशीबाहेरचे शिक्षण :

देशाच्या प्रगतीचा पाया शिक्षणावर उभा असतो, ही बाब सर्वमान्य आहे. परंतु भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात शिक्षणाचा मूलभूत हक्क अजूनही लाखो मुलांसाठी केवळ कागदोपत्री राहिला आहे, ही वस्तुस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. केंद्र सरकारच्या नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या 'स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया' या अहवालाने आणि महाराष्ट्रातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या विदारक वास्तवाने सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेतील अनेक गंभीर त्रुटी पुन्हा एकदा अधोरेखित केल्या आहेत.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७८ | सोमवार दि.०८ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी दर्जेदार सुविधा–मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर :** नागपुरात व्यापक स्तरावर क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. या सोयी–सुविधांमुळे क्रीडा क्षेत्रात मनुष्यबळ तयार होण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नागपुरात आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कविवर्य सुरेश भट सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार संजय भेंडे, अरुण लखानी, महापौर नीता ठाकरे, क्रीडा महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष संदीप जोशी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### अभियांत्रिकी पदविका प्रवेशाची मुदत २२ जून

**मुंबई :** शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी दहावीनंतरच्या अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेला चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत सुमारे ८७ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांना २२ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार असल्याची माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाने दिली आहे. दहावीनंतरच्या केंद्रीभूत पदविका प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया २० मे २०२६ पासून सुरू झाली आहे. प्रवेशासाठी उमेदवार भारतीय नागरिक असणे आवश्यक असून, त्याने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) अथवा समतुल्य परीक्षा किमान ३५ टक्के गुणांसह उत्तीर्ण केलेली असावी. दहावीमध्ये तांत्रिक (टेक्निकल) विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी १५ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

### टीव्हीके सरकार ३ महिनेही टिकणे अवघड – एम.के.स्टॅलिन

तमिळनाडूत केवळ आमच्या आणि मित्रपक्षांच्या कृपेने टीव्हीके सत्तेत असल्याचा दावा करणारे द्रमुकचे प्रमुख एम.के.स्टॅलिन यांनी नवे भाकीत केले. टीव्हीकेच्या नेतृत्वाखालील सरकार ३ महिनेही टिकणे अवघड असल्याचे त्यांनी म्हटले. टीव्हीकेच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारवर मी सहा महिने टीका न करण्याचे ठरवले होते. तसे मी बोलूनही दाखवले. मात्र, आताचे सरकार ज्या प्रकारचे आहे; त्याविषयी अधिक बोलण्याची गरज नाही. अर्थात, लवकरच बोलावे लागण्याची स्थिती निर्माण झाली आहे. आताच अनेक जण नव्या सरकारवर टीका करत आहेत. प्रश्न सहा, पाच किंवा चार महिन्यांचा नाही. आताचे सरकार तीन महिने तरी टिकेल का असा प्रश्न पुढे आला आहे, असे स्टॅलिन यांनी म्हटले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.०६ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६५.५० क्विंटल | २,१५० | २,४०० | २,२८० |
| ज्वारी/हायब्रिड: १११.०० क्विंटल | २,२९१ | ३,९६८ | २,८०६ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,८०० | ७,३६१ | ७,१५३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ५३.०० क्विंटल | २,२०० | २,७४५ | २,३५५ |
| मुग: ८.०० क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: १३.५० क्विंटल | ५,५८० | ७,३५८ | ६,८३९ |

# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला स्थगिती

## नवीन प्रारूपासाठी खारगे समिती, मंदिरांचे हक्क अबाधित राहणार



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील देवस्थानांच्या इनाम जमिनींसंदर्भातील वादग्रस्त ठरलेल्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६' च्या प्रारूपाला राज्य सरकारने अखेर स्थगिती दिली आहे. विविध हिंदुत्ववादी संघटना, मंदिर व्यवस्थापन समित्या आणि धार्मिक संस्थांच्या तीव्र विरोधानंतर सरकारने हा निर्णय घेतला असून आता नवीन प्रारूप तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात येणार आहे.

प्रस्तावित कायद्यात देवस्थानांच्या मालकीच्या जमिनी वहिवाटदार, मिरासदार, कुळ, पुजारी तसेच प्रत्यक्ष जमिनी कसणाऱ्या व्यक्तींच्या नावावर करण्याची तरतूद करण्यात आली होती. याशिवाय देवस्थानांच्या जमिनींवरील अतिक्रमणे नियमित करण्याचाही प्रस्ताव होता. ◄◄ पान २ वर

### हिवाळी अधिवेशनात नवा कायदा

सरकारचा उद्देश देवस्थानांच्या जमिनींशी संबंधित दीर्घकालीन वाद मिटविणे आणि जमीनधारक, वहिवाटदार तसेच धार्मिक संस्थांचे हित संतुलित राखणे हा असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. नव्याने तयार होणारा कायदा विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मंजुरीसाठी मांडला जाईल. या कायद्यात देवस्थानांचे मालकी हक्क आणि हित अबाधित ठेवले जातील, अशी ग्वाही महसूलमंत्र्यांनी दिली.

# देशात तुम्ही किती जणांना पाकिस्तानी म्हणणार?




**दिल्ली । वृत्तसंस्था**

"देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून दरवर्षी लाखो ग्रॅज्युएट्स बेरोजगार फिरत आहेत. पेपर लीकच्या सत्रांमुळे तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त होत असतानाही सरकार जबाबदारी घ्यायला तयार नाही. दिल्लीतील जंतर-मंतरवर झालेले आंदोलन हा केवळ ट्रेलर होता, आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र होईल," असा इशारा देत देशात तुम्ही किती जणांना पाकिस्तानी म्हणणार? इथं फक्त भाजपच भारतीय आहेत का?, असा सवाल कॉकरोच जनता पार्टी या डिजिटल चळवळीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी रविवारी (दि. ७) पत्रकार परिषदेत केला.

"आज देशात दरवर्षी सुमारे ५० लाख तरुण पदवीधर (ग्रॅज्युएट) होतात. मात्र, त्यापैकी केवळ २० लाख तरुणांनाच नोकऱ्या मिळतात. उर्वरित ३० लाख पदवीधरांना नोकरी मिळत नाही. गेल्या १०–१२ वर्षांपासून देशात केवळ धर्माच्या नावाखाली राजकारण सुरू आहे. या राजकारणाने कोणालाही रोजगार मिळत ◄◄ पान २ वर

### फडणवीस हे युपीचे नाही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका विधानाचा समाचार घेताना अभिजित दिपके म्हणाले, "जय भीमच्या घोषणा आणि आंबेडकरांचे पुस्तक यामुळे अराजकता पसरते, असे मुख्यमंत्र्यांना म्हणायचे आहे का? देवेंद्र फडणवीस यांनी लक्षात ठेवावे की, उत्तर प्रदेशचे नाही तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. महाराष्ट्र हा पुरोगामी, सेक्युलर आणि विचारवंत विचारांचा आहे. अशा राज्यात आंबेडकरी विचारांचा अपमान खपवून घेतला

# राज्यात गुटखा, पानमसाला अन्नपदार्थ विक्रेत्यांवर १९५ धाडी!

## १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त, १९२ व्यक्तींना अटक



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थांविरुद्धची विशेष मोहीम प्रभावीपणे सुरू आहे. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १९२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या पाच दिवसांच्या कालावधीत राज्यभर १९५ धाडी टाकण्यात आल्या असून या कारवाईत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.

अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्रीस आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे. भारतीय न्याय संहिताचे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्याचे कलम २६, २७, ३०(२) आणि कलम ५९ अंतर्गत

# पुढच्या ४८ तासांत मान्सून महाराष्ट्रात

## विदर्भ–पश्चिम महाराष्ट्रात यलो अलर्ट; हवामान विभागाची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा आता संपली आहे. नैऋत्य मान्सून गोव्यात दाखल झाला असून, भारतीय हवामान विभागाने पुढील ४८ तासांत तो कोकण किनारपट्टीमार्गे महाराष्ट्रात दाखल होईल, असा अंदाज वर्तवला आहे. मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती



अनुकूल होत असल्याने, राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ११ जूनपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पावसाचा जोर वाढेल.

गेल्या काही दिवसांपासून सुरू ◄◄ पान २ वर

### लक्ष्मण हाके कॉकरोच जनता पार्टीच्या वाटेवर?

**सांगली । प्रतिनिधी**

राज्यातील प्रस्थापित नेत्यांना आणि सध्याच्या राजकीय व्यवस्थेला त्यांची जागा दाखवून देण्यासाठी मी प्रसंगी 'कॉकरोच जनता पार्टी'चा सदस्य होण्यासही तयार आहे, असे खळबळजनक विधान ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केले आहे. सांगली येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी हे ◄◄ पान २ वर

# हे सरकार नागरिकांचे संरक्षण करू शकत नाही

## दरवाढीवरून विरोधकांची केंद्र सरकारवर जोरदार टीका

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ केल्यामुळे विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. महागाईचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकल्याचा आरोप काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसने सरकारवर केला आहे.

महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत पुन्हा २९ ची वाढ केली आहे. या



दरवाढीनंतर दिल्लीतील १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरची किंमत ९१३ वरून ९४२ रूपये झाली आहे. ही दरवाढ गेल्या तीन ◄◄ पान २ वर

# लाचखोर तहसीलदाराची झाडाझडती रोख रक्कमेसह सोने, चांदी जप्त !

**जालना–संभाजीनगर । प्रतिनिधी**

बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कारवाई केलेले अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी झडती घेण्यात आली. या झडतीत १ लाख ८ हजार ८०० रुपयांची रोख रक्कम, ८.८ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ८० ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली.

गोदापात्रातील अवैध वाळू




उपसा करणाऱ्या पोकलंड मशीनवर कारवाई न करण्यासाठी तसेच सहा हायवा वाहने सुरु ठेवण्यासाठी संबंधित तक्रारदाराकडे तब्बल ७ लाख रुपयांच्या मासिक हप्त्याची मागणी केली होती. त्यानंतर झालेल्या ◄◄ पान २ वर

# सत्ताधाऱ्यांनीचं काँग्रेसला बायकॉट करत कॉकरोजला पुढे आणले?

**पुणे–बीड । प्रतिनिधी**

देशात निट पेपर फुटी प्रकरण, बेरोजगारी यावर काँग्रेसने आवाज उठवणे अपेक्षित असताना काल्पनिक पण प्रत्यक्षात रस्त्यावर उतरून पुढे आलेल्या कॉकरोच जनता पार्टीने आवाज उठवून देशाचे लक्ष केंद्रित केले आहे. या आंदोलनामुळे उद्या केंद्रीय आरोग्य मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा देखील होईल मात्र त्याचे श्रेय काँग्रेसला नव्हे तर कॉक्रोज जनता पार्टीला जाईल. काँग्रेसला श्रेय न देण्यासाठी सत्ताधाऱ्याकडून कॉकरोज प्रयोग झाला असल्याचे राजकीय जाणकारांच्या मतांमधून दिसून येत आहे.




नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण आणि वाढत्या बेरोजगारीच्या मुद्द्यावरून देशातील तरुण वर्गामध्ये तीव्र संताप पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर, युवकांच्या प्रचंड रोषाला सोबत घेत कॉकरोज जनता पार्टीच्या वतीने दिल्लीत केंद्र सरकारविरोधात एक मोठे आणि आक्रमक आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनादरम्यान,

### राजकीय वर्तुळातील खमंग चर्चा

सर्वसामान्य जनतेतून आणि राजकीय विश्लेषकांकडून अशीही शंका उपस्थित केली जात आहे की, मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला खिळखिळे करण्यासाठी आणि त्यांचे महत्त्व कमी करण्यासाठी खुद्द सत्ताधारी भाजप पक्षानेच कॉकरोज पार्टीला जन्म दिला आहे का?

### काँग्रेसऐवजी कॉकरोजची चर्चा

सध्याच्या राजकीय चित्रामुळे देशात मुख्य विरोधी पक्षाच्या भूमिकेत काँग्रेसऐवजी कॉकरोज जनता पार्टीलाच पुढे आणले जात असल्याचे दिसत आहे. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असताना, आता या संवेदनशील मुद्द्यावर श्रेयाचे राजकारण कोण जिंकणार आणि सरकार या आंदोलनाला कशी उत्तर देणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.



पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा तातडीने राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली. विशेष म्हणजे, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही यापूर्वी पत्रकार परिषद घेऊन आणि संसदेत केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आग्रही मागणी केली होती. मात्र, राजकीय वर्तुळात आणि सर्वसामान्यांमध्ये आता वेगळीच चर्चा रंगू लागली आहे. "उद्या जर धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला, तर त्याचे श्रेय काँग्रेसचे मुख्य विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना न मिळता, थेट कॉकरोज जनता पार्टीला ◄◄ पान २ वर

cmyk

cmyk



अग्रलेख

# वेशीबाहेरचे शिक्षण : सरकारी उदासीनतेची गंभीर किंमत

देशाच्या प्रगतीचा पाया शिक्षणावर उभा असतो, ही बाब सर्वमान्य आहे. परंतु भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात शिक्षणाचा मूलभूत हक्क अजूनही लाखो मुलांसाठी केवळ कागदोपत्री राहिला आहे, ही वस्तुस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. केंद्र सरकारच्या नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या 'स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया' या अहवालाने आणि महाराष्ट्रातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या विदारक वास्तवाने सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेतील अनेक गंभीर त्रुटी पुन्हा एकदा अधोरेखित केल्या आहेत. शिक्षण क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक, शाळांची उपलब्धता, शिक्षकांची कमतरता आणि वाढते खासगीकरण या सर्व प्रश्नांचा विचार करता, देशातील शिक्षणव्यवस्था एका महत्त्वाच्या वळणावर उभी असल्याचे स्पष्ट दिसते.

गेल्या दशकात देशभरातील तब्बल एक लाख सरकारी आणि अनुदानित शाळा बंद झाल्या, तर त्याच काळात ५१ हजार खासगी शाळांची वाढ झाली. ही केवळ आकडेवारी नाही; तर ती राज्यकर्त्यांच्या प्राधान्यक्रमातील बदलाची साक्ष आहे. शिक्षण क्षेत्रात सरकारची भूमिका मागे सरकत असताना खासगी क्षेत्राचा प्रभाव वाढत आहे. परिणामी, शिक्षण हा मूलभूत अधिकार न राहता तो हळूहळू बाजारपेठेतील वस्तू बनत चालला आहे. गरीब, आदिवासी, ग्रामीण आणि वंचित समाजघटकांसाठी ही परिस्थिती अधिकच घातक ठरत आहे. महाराष्ट्रासारख्या स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्या राज्यात आजही जवळपास चार हजार गावे आणि पाड्यांतील २४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी गावाबाहेर जावे लागते, ही वस्तुस्थिती अत्यंत लाजिरवाणी आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्राथमिक शाळा एक किलोमीटर आणि माध्यमिक शाळा पाच किलोमीटरच्या परिसरात उपलब्ध असणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक विद्यार्थ्यांना १० ते २० किलोमीटरपर्यंतचा प्रवास करावा लागतो. काही भागात खाड्या पार करण्यासाठी होडीचा आधार घ्यावा लागतो, तर काही ठिकाणी जंगलातून जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. पावसाळ्यात हा प्रवास अशक्य झाल्यावर मुलांचे शिक्षण महिनोनमहिने खंडित होते.अशा परिस्थितीत शासनाने विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता देण्याचा पर्याय पुढे केला असला, तरी तो मूळ समस्येवरील उपाय ठरत नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळ दर्जेदार शाळा उपलब्ध करून देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. प्रवास भत्ता हा त्या अपयशावर टाकलेला तात्पुरता पडदा आहे. शिक्षणाच्या मूलभूत हक्काची पूर्तता करण्याऐवजी त्याची आर्थिक भरपाई देण्याचा प्रयत्न हा प्रशासनाच्या दृष्टीकोनातील दोषच दर्शवतो.

शिक्षण व्यवस्थेतील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे शिक्षकांची कमतरता. नीती आयोगाच्या अहवालानुसार देशातील एक लाखाहून अधिक शाळा केवळ एका शिक्षकाच्या भरवशावर चालत आहेत. हजारो शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या नगण्य आहे, तर अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांचाही अभाव आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वतंत्र स्वच्छतागृहे, ग्रंथालय, प्रयोगशाळा आणि डिजिटल साधने यांसारख्या सुविधांशिवाय गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा कशी करणार? शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया कमकुवत होत आहे. अनेक शिक्षकांना प्रशासकीय कामांमध्ये गुंतवले जात असल्याने अध्यापनावर विपरीत परिणाम होत आहे.या सर्व पार्श्वभूमीवर पालक खासगी शाळांकडे वळत आहेत. अनेकदा यामागे केवळ इंग्रजी माध्यमाचे आकर्षण नसते; तर सरकारी शाळांबद्दलचा कमी झालेला विश्वास हे त्यामागील प्रमुख कारण असते. सरकारी शाळांमध्ये सुविधा आणि गुणवत्तेचा अभाव असताना पालक आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी अधिक खर्च करण्यास तयार होतात. परिणामी, शिक्षणातील सामाजिक विषमता अधिक तीव्र होत आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबे दर्जेदार शिक्षण मिळवू शकतात; परंतु गरीब कुटुंबातील मुलांसाठी पर्याय मर्यादित राहतात.

गेल्या काही वर्षांत शाळांचे विलीनीकरण आणि बंद करण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर राबवली गेली. प्रशासनाच्या दृष्टीने हा निर्णय आर्थिकदृष्ट्या सोयीचा असू शकतो; परंतु त्याचे सामाजिक परिणाम गंभीर आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागातील शाळा म्हणजे केवळ शिक्षण केंद्र नसतात; त्या त्या गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि विकास प्रक्रियेचा केंद्रबिंदू असतात. शाळा बंद झाल्यानंतर अनेक कुटुंबे स्थलांतराचा विचार करू लागतात आणि गावांचा विकास खुंटतो. कोठारी आयोगाने शिक्षणासाठी देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या किमान सहा टक्के खर्चाची शिफारस केली होती. दुर्दैवाने आजही शिक्षणावरील खर्च त्या पातळीपर्यंत पोहोचलेला नाही. शिक्षणाला खर्च म्हणून पाहण्याची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. शिक्षणावरील गुंतवणूक ही प्रत्यक्षात राष्ट्रनिर्मितीतील सर्वात मोठी गुंतवणूक असते. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळेच कौशल्यसंपन्न मनुष्यबळ तयार होते, सामाजिक समता निर्माण होते आणि आर्थिक प्रगतीचा मार्ग मोकळा होतो. विशेषतः आदिवासी आणि दुर्गम भागातील मुलांसाठी निवासी शाळा, वाहतूक सुविधा, डिजिटल शिक्षण केंद्रे आणि स्थानिक स्तरावर शिक्षकांची भरती यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवण्याची गरज आहे. शिक्षण विभागाने केवळ आकडेवारीवर आधारित निर्णय न घेता भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक वास्तव लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रत्येक पाड्यावर स्वतंत्र शाळा उभारणे शक्य नसले तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येणार नाही, अशी यंत्रणा निर्माण करणे शासनाची जबाबदारी आहे.

आज भारत विकसित राष्ट्र बनण्याची स्वप्ने पाहत आहे. परंतु देशाच्या दुर्गम भागातील एखादे मूल अजूनही शिक्षणासाठी मैलोनमैल पायपीट करत असेल, तर त्या विकासाच्या दाव्यांना अर्थ उरत नाही. शिक्षण हक्क कायद्याचा आत्मा जिवंत ठेवायचा असेल, तर शाळा बंद करण्याऐवजी त्या सक्षम करण्यावर भर द्यावा लागेल. अन्यथा वंचित समाजातील लाखो मुलांचे भविष्य वेशीबाहेरच अडकून राहील आणि सामाजिक न्यायाचे स्वप्न केवळ भाषणांपुरते मर्यादित राहील. शिक्षणाला खर्च नव्हे तर राष्ट्राच्या भवितव्याची गुंतवणूक मानून सरकारने ठोस आणि दीर्घकालीन धोरणे राबवली, तरच खऱ्या अर्थाने समताधिष्ठित आणि प्रगत भारताची निर्मिती शक्य होईल.

## सौ.शितल पाटील, जोशी यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

बीड । प्रतिनिधी

निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्षावर संशोधन; सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांना पीएच.डी. छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या कला विद्याशाखेअंतर्गत इंग्रजी विषयात सौ. शीतल सुशील पाटील (सौ. शीतल लक्ष्मण जोशी) यांनी "Conflict between Nature and Man in the Select Works of Amitav Ghosh"या विषयावर संशोधन पूर्ण करून विद्यावाचस्पती (..) पदवी संपादन केली आहे.



सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांच्या संशोधन कार्यास डॉ. मनोज एल. सोमवंशी, शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहरा, जि. धाराशिव येथील प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संशोधनामध्ये प्रख्यात साहित्यिक अमिताव घोष यांच्या निवडक साहित्यकृतींच्या माध्यमातून निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्ष, पर्यावरणीय संकटे, हवामान बदलाचे परिणाम आणि मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांनी प्राप्त केलेल्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे संशोधन क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

## समीर काझी यांच्या तर्फे चंदन पठाण व सरफराज काझी यांचा हृदयसत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड येथून प्रकाशित होणाऱ्या सायं. दैनिक बीड सिटीझनचे कार्यकारी संपादक तथा दैनिक पार्श्वभूमीचे उपसंपादक चंदन पठाण यांना यंग जर्नालिस्ट ऑफ द इयर २०२६ पुरस्कार मिळाल्याबद्दल, तर शिवसेनेच्या बीड जिल्हाप्रमुखपदी सरफराज काझी यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी गेवराईचे ज्येष्ठ समाजसेवक जे.डी.शाह व ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचा हृदयसत्कार केला.



पत्रकार चंदन पठाण हे सायं.दैनिक बीड सिटीझनचे कार्यकारी संपादक तथा दैनिक पार्श्वभूमीचे उपसंपादक असून गेल्या २० वर्षांपासून वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांना बीडबीडथील पद्मपाणी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार, अंबाजोगाई पत्रकार संघाचा प्रतिष्ठेचा कै. धनंजय गद्रे स्मृती पत्रकारिता पुरस्कार, अखिल भारतीय उर्दू शिक्षक परिषदेचा आयडियल जर्नालिस्ट पुरस्कार, गेवराई तालुक्यातील श्री.मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार, उर्दू दैनिक अल हिलाल वृत्तपत्र समूहाचा राज्यस्तरीय पुरस्कार आदी पुरस्कार मिळालेले आहेत. तर तरुण, तडफदार व धडाडीचे युवा नेतृत्व असलेले सरफराज नवाब काझी हे महाराष्ट्र राज्य काझी सेवा संघाचे जिल्हा युवा कार्याध्यक्ष आहेत. चंदन पठाण यांना यंग जर्नालिस्ट ऑफ द इयर २०२६ हा पुरस्कार मिळाल्याबद्दल तर सरफराज काझी यांची महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ रावजी शिंदे गटाच्या शिवसेना बीड जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी शनिवार, दिनांक ६ जून २०२६ रोजी दुपारी आपल्या कार्यालयात बोलावून त्यांचा हृदयसत्कार केला. याप्रसंगी गेवराईचे ज्येष्ठ पत्रकार काझी अमान व ज्येष्ठ समाजसेवक जे.डी.शाह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पान १ वरून...

### पर्यावरण दिनानिमित्त वडवणीत

त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच आपल्या पृथ्वीचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून वसुंधरेचे रक्षण केले पाहिजे. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने निसर्गाशी आपली नाळ अधिक घट्ट जोडून स्वच्छ हवा, हिरवेगार वातावरण आणि सुरक्षित भविष्य घडविण्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे, असे मत यावेळी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी व्यक्त केले. तसेच पर्यावरण संरक्षणासाठी एकल वापराच्या प्लास्टिकला पूर्णपणे नकार देण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या एक व्यक्ती-एक झाड या संकल्पनेला प्रत्यक्षात साकार करण्यासाठी गावातील प्रत्येक घरासमोर किमान एक झाड लावण्याचा निर्धार करण्यात आला. या संकल्पात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय भूमिका बजावण्याची ग्वाही दिली. वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनावर भर देत भविष्यातही अशा जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### कर्जमाफीच्या जीआरची

ज्या काही अटी शर्ती शेतकऱ्यावर लादलेले आहेत त्या अटी शर्ती बाजूला काढून सर्वसामान्य शेतकऱ्याला कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा अशी पद्धतीची मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, माणिक आमटे, सुभाष काळे ,सुभाष सपकाळ, नवनाथ सपकाळ, बबन आमटे, संजय आमटे, प्रदीप आमटे ,भिवाजी धारवाडकर, पिनु आमटे, रवी सपकाळ, प्रकाश काळे, दामोदर आमटे, दिलीप झणझणे, महादेव झणझणे, नवनाथ बुरांडे, हनुमान अवघड, लक्ष्मण आमटे, अर्जुन अवघड, बाळू आमटे आदी उपस्थित होते.

### देवस्थानांच्या खिदमत-माश

उपजीविकेची जबाबदारी देवस्थानावर येते. अशा परिस्थितीत एकीकडे सेवा-जमिनीचा लाभ खाजगीरित्या घेतला जातो आणि दुसरीकडे नव्या सेवेकऱ्याचा खर्च देवस्थानाला करावा लागतो. याचा थेट परिणाम देवस्थानाच्या आर्थिक हितावर होतो.

कायद्याच्या दृष्टीनेही वंशपरंपरागत सेवा आणि मालकी हक्क या दोन स्वतंत्र बाबी असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. सेवा करण्याचा अधिकार हा मालकी हक्क नसून जबाबदारीशी संबंधित अधिकार आहे. त्यामुळे सेवा संपली तर सेवेवर आधारित विशेष हक्कही संपला पाहिजे का? हा प्रश्नही उपस्थित होत आहे.

केवळ विरासत प्रमाणपत्र किंवा मुतवलीपद असल्याने देवस्थानाच्या जमिनींवर मालकी हक्क, देवस्थानाच्या उत्पन्नातील कायमस्वरूपी हिस्सेदारी किंवा देवस्थानाच्या मालमत्तेचा वैयक्तिक लाभ घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही, असे मत अनेक अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

यामुळे खिदमत-माश व मदद-माश जमिनींच्या बाबतीत केवळ महसूल नोंदींचा आधार न घेता त्या जमिनी कोणत्या उद्देशाने देण्यात आल्या, त्यावरील अटी काय होत्या आणि त्यांचा धार्मिक सेवेशी असलेला संबंध काय होता याचा सखोल अभ्यास होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा देवसेवेसाठी दिलेले साधन वैयक्तिक मालमत्तेत रूपांतरित होण्याचा धोका असून देवस्थानांचा आर्थिक आधार कमकुवत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विषयाचा ऐतिहासिक, सामाजिक आणि कायदेशीर दृष्टीकोनातून सर्वंकष पुनर्विचार होणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या

करून देणे हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता राहणार आहे. बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी सातत्याने काम करत राहू. असेही अमर नाईकवाडे यावेळी बोलताना म्हणाले. यावेळी माझ्यासह गटनेते फारूक पटेल साहेब, संपादक शेख मुजीब भाई, ज्येष्ठ नगरसेवक सय्यद सादिक जमा, नगरसेवक अशफाक इनामदार, नगरसेवक जैतुल्ला खान, नगरसेवक रामदास सरवदे, नगरसेवक शेख बब्बू, नगरसेवक जकी सौदागर, बरकत पठाण, माजी नगरसेवक शेख इकबाल, शेरखान आदी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

### संतांच्या संगतीत सुखाची

होतो नामस्मरणामध्ये वाल्याचा वाल्मिकी करण्याची ताकद ही राम नामाच्या नामस्मरणामध्ये आहे.

मनुष्याने आपल्या जीवन सुखी करण्याकरिता साधुसंतांच्या संगती मध्ये राहावे सज्जनाच्या संगतीत राहावे साधुसंतांची सेवा केल्याने आयुष्याचं कल्याण होते त्यामुळे साधुसंत गुरुजन यांची सेवा नेहमी करावी असे गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांनी अभंग प्रवेशनामध्ये मार्गदर्शन केले या वेळी हरीकिरतनात टाळकरी माळकरी भजनी मंडळी मृदंगाचार्य गायनाचार्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या कार्यक्रमासाठी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती मंगला प्रकाश सोळंके, उपाध्यक्षा श्रीमती पल्लवीताई वीरेंद्र सोळंके आणि सचिव श्रीमती नीला देशमुख यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन व पर्यवेक्षण जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य प्रा. डॉ. पॉलराज एम. (पीटी) यांनी केले. कार्यालय अधीक्षक श्री. वाघ सर यांनी प्रशासकीय सहकार्य केले. तसेच श्री. प्रवीण कुमार ( उपमुख्याध्यापक, जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग), श्री. इरफान पठाण सर यांच्यासह दोन्ही महाविद्यालयांतील शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षणाच्या माध्यमातून हरित, स्वच्छ आणि सुरक्षित भविष्य घडविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

## पान १ वरून...

### हे सरकार नागरिकांचे संरक्षण

महिन्यांतील दुसरी वाढ असून, मार्च महिन्यातही घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ६० रूपयांची वाढ करण्यात आली होती. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात निर्माण झालेल्या अस्थिरतेचा परिणाम इंधनाच्या दरांवर होत असल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जात आहे. दरवाढीनंतर काँग्रेसने पुन्हा एकदा महागाई पुरुष मोदी म्हणत सरकारवर टीका केली. पक्षाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये लिहीले आहे की, ''महागाई पुरुष मोदी यांनी पुन्हा एकदा महागाईचा बडगा उगारला आहे. आता घरगुती गॅस सिलिंडर २९ रुपयांनी महाग झाला आहे. मोदींचे सूत्र स्पष्ट आहे, जनतेकडून पैसे उकळायचे आणि आपल्या श्रीमंत मित्रांच्या तिजोऱ्या भरायच्या.'' आम आदमी पक्षानेही या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. पक्षाने म्हटले की, ''अवघ्या तीन महिन्यांत दुसऱ्यांदा घरगुती गॅस सिलिंडर महाग करण्यात आला आहे. महागाईमुळे जनता आधीच त्रस्त आहे, त्यात मोदी सरकारने त्यांच्या पोटावरच लाथ मारली आहे.'' तृणमूल काँग्रेसनेही केंद्र सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले. पक्षाने एक्स वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात आणखी २९ रुपयांची वाढ. हेच भाजपचे मॉडेल आहे. जेव्हा जागतिक संकटे येतात, तेव्हा गरीब चिंतेत असतात आणि श्रीमंत मात्र भरभराट करत राहतात. विश्वगुरू असल्याचा दावा करणारे सरकार आपल्याच नागरिकांना वारंवार बसणाऱ्या दरवाढीच्या धक्क्यांपासून वाचवू शकत नाही. भविष्याचा विचार करून कुटुंबांना दिलासा देण्याऐवजी, मोदी सरकार सर्वसामान्यांवरच आर्थिक बोजा टाकत आहे. श्रीमंतांसाठी ही किरकोळ गोष्ट असली तरी लाखो कुटुंबांसाठी मात्र घरगुती बजेटवर हा आणखी एक मोठा आघात आहे.''

### सत्ताधाऱ्यांनीचं काँग्रेसला

जाईल,'' अशी रणनीती विरोधकांकडून आखली जात असल्याचे दिसते. देशात काँग्रेस हा मुख्य विरोधी पक्ष असतानाही, इतक्या मोठ्या पेपरफुटी प्रकरणावर केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा झाला, तरी त्याचे श्रेय काँग्रेसला घेता येऊ नये, अशी राजकीय खेळी पडद्यामागे सुरू असल्याचा आरोप होत आहे. देशामध्ये भाजपाला विरोधक म्हणून सध्या काँग्रेसच प्रबळ आहे, मात्र अशा काही घटनांमध्ये काँग्रेस पक्षाला श्रेय जाऊन पक्षाची प्रतिमा पुन्हा जनसामान्यात रुजली जाऊ नये यासाठी भाजपानेच खेळी करत कॉकरोजला जन्म दिल्याची चर्चा आहे. यामुळे काँग्रेस पुन्हा बॅक फुटला जाईल ही अशा सत्ताधाऱ्यांमध्ये निर्माण झाली असावी. कारण बेरोजगारी, पेपर फुटी प्रकरण यावर विरोधकांनी आक्रमक व्हायला पाहिजे मात्र काँग्रेस तशी आक्रमक होताना दिसली नाही, परंतु काँग्रेस आक्रमक होत असतानाच अचानक कॉकरोजचा झालेला जन्म पाहता ही राजकीय खेळी नसावी हे कशावरून अशी देखील चर्चा आता होताना दिसत आहे.

### लाचखोर तहसीलदाराची

तडजोडीनुसार ६ लाख ४० हजार रुपयांची लाच छत्रपती संभाजीनगर येथील राहत्या घराच्या परिसरात स्वीकारताना बीड एसीबीच्या पथकाने सापळा रचून रंगेहाथ पकडले. त्यानंतर त्यांच्या मालमत्तेची पडताळणी आणि घरझडतीची प्रक्रिया राबविण्यात आली. या झडतीदरम्यान रोख रक्कम तसेच मौल्यवान दागिने आढळून आल्याने ते जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास एसीबीकडून सुरू असून जप्त करण्यात आलेल्या साहित्याबाबतही चौकशी केली जात आहे. एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान कवडे हे करीत आहेत.

### राज्यात गुटखा, पानमसाला

गुन्हे दाखल करून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार प्रतिबंधित अन्नपदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. धुळे येथे टाकण्यात आलेल्या धाडीत २३ लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. समृद्धी महामार्गावर सावंगी टोल नाका येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६० लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन तर नांदेड येथे करण्यात आलेल्या धडक कारवाईत १७ लाख ५२ हजार ४५० रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन जप्त करण्यात आले. तसेच मोशी, पिंपरी-चिंचवड येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६ लाख १९ हजार ९८२ रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करून सहा व्यक्तींविरुद्ध चिखली, पिंपरी-चिंचवड या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा असल्याच्या संशयावरून करण्यात आलेल्या कारवाईत १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपये किंमतीचा साठा परांडा, ता. परांडा, जि. धाराशिव येथे जप्त करण्यात आला असून दोन जणांना अटक करण्यात आली आहे. बृहन्मुंबई क्षेत्रात ३० धाडीमध्ये ३ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत ३० व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. पुणे क्षेत्रात ७९ धाडीमध्ये ८ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ७८ व्यक्तींना अटक केली आहे, असे सह आयुक्त (अन्न) महेश ना. चौधरी यांनी कळविले आहे.

### देशात तुम्ही किती जणांना

नाही किंवा विद्यार्थ्यांची परीक्षाही चांगली जात नाही. त्यामुळे आता सरकारने आपला फोकस बदलून शिक्षण आणि रोजगारावर काम केले पाहिजे.'' नीट आणि सीबीएसई संदर्भातील गोंधळावर बोलताना त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. ''प्रायव्हेट नोकरीमध्ये एक-दोन चुका झाल्या तरी कर्मचाऱ्याला काढून टाकतात. मग इथे देशात दररोज सरकारी परीक्षांचे पेपर लीक होत असताना कोणाचाही राजीनामा का येत नाही? जोपर्यंत जबाबदारी निश्चित करून राजीनामा दिला जात नाही, तोपर्यंत शिक्षण व्यवस्था सुधारेल कशी? आम्ही शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी एक पूर्ण अजेंडा तयार करत आहोत,'' असे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनाला बदनाम करण्याच्या प्रयत्नांवरून त्यांनी सत्ताधारी भाजप आणि त्यांच्या आयटी सेलला धारेवर धरले. ''सरकारला प्रश्न विचारणाऱ्या कोणालाही हे लोक पाकिस्तानी ठरवतात. मग देशातील विद्यार्थी, विरोधक आणि प्रश्न विचारणारे पत्रकार हे सगळेच पाकिस्तानी आहेत का? तर मग भारतीय नक्की कोण? फक्त आयटी सेलवालेच भारतीय आहेत का?'' असा संतप्त सवाल करत जंतर-मंतरवर सिक्कीमपासून ते देशाच्या विविध कानाकोपऱ्यांतून तरुण शांततापूर्ण आंदोलनासाठी आले होते, अशी माहिती त्यांनी दिली. या आंदोलनामागे आम आदमी पार्टी किंवा अरविंद केजरीवाल असल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. ''आमची मूव्हमेंट कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाही. हा राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी युवकांचा स्वतःचा लढा आहे. पाच वर्षांतून एकदा केवळ मत देणं म्हणजे पॉलिटिक्स नाही, तर पाचव्या वर्षी मत देताना नेत्यांना प्रश्न विचारणं म्हणजे खरं पॉलिटिक्स आहे,'' असे दिपके म्हणाले.

कोणत्याही राजकीय पक्षाशी थेट न जोडता, युवकांच्या बळावरच हा लढा पुढे नेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगरमध्येही लवकरच भव्य आणि शांततापूर्ण आंदोलन छेडण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी शेवटी केली.

### देवस्थान इनाम निर्मूलन

मात्र या तरतुदींमुळे मंदिरांच्या मालकी हक्कांवर गदा येईल, असा आरोप करत अनेक मंदिर संस्थांनी सरकारविरोधात भूमिका घेतली होती. या प्रारूपाविरोधातील सर्वात मोठा मुद्दा म्हणजे सरकारने केवळ हिंदू देवस्थानांच्या जमिनींबाबतच हस्तक्षेप केल्याचा आरोप. वक्फ बोर्ड किंवा चर्चच्या मालकीच्या जमिनींवर अशा प्रकारचे कायदे लागू केले जात नसताना फक्त मंदिरांच्या जमिनींबाबतच हस्तक्षेप का केला जात आहे, असा सवाल विविध संघटनांनी उपस्थित केला होता. अनेक धार्मिक संस्थांनी हा प्रस्ताव मंदिरांच्या आर्थिक स्वायत्ततेवर आघात करणारा असल्याचे म्हटले होते. महाराष्ट्रातील अनेक मोठ्या आणि लहान देवस्थानांच्या व्यवस्थापनांनी प्रस्तावित कायद्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली. मंदिरांच्या जमिनी या भाविकांनी दिलेल्या देणग्यांमधून किंवा ऐतिहासिक परंपरेतून प्राप्त झालेल्या असल्याने त्या कोणत्याही परिस्थितीत इतरांच्या नावावर करता येणार नाहीत, असे मत व्यक्त करण्यात आले. विविध जिल्ह्यांत निवेदने, बैठका आणि आंदोलनांच्या माध्यमातून विरोध नोंदविण्यात आला होता. महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, सुधारित प्रारूपावर नागरिक, देवस्थान व्यवस्थापन, शेतकरी आणि संबंधित घटकांना १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हरकती व सूचना नोंदविता येतील. सर्व बाजूंचा विचार करून अंतिम कायद्याचा मसुदा तयार केला जाईल. राज्य सरकारच्या स्थगितीच्या निर्णयामुळे सध्या निर्माण झालेला वाद काही प्रमाणात शांत झाला असला, तरी आगामी काळात खारगे समिती कोणत्या शिफारसी करते आणि नवीन कायद्यात नेमक्या कोणत्या तरतुदी समाविष्ट केल्या जातात, याकडे राज्यातील धार्मिक संस्था, शेतकरी आणि राजकीय वर्तुळांचे लक्ष लागले आहे.

**खारगे समिती करणार पुनर्विचार**

वाढत्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. या समितीत विभागीय आयुक्त (पुणे व कोकण), जिल्हाधिकारी (ठाणे व अहिल्यानगर), सहसचिव मनीषा जायभाये तसेच विविध देवस्थानांचे १५ प्रतिनिधी यांचा समावेश असेल. समिती देवस्थानांच्या जमिनींशी संबंधित सर्व बाबींचा अभ्यास करून नवीन प्रारूप तयार करणार आहेत. सरकारने समितीला १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

**साडेपाच लाख हेक्टर जमिनींचा प्रश्न**

महाराष्ट्रात सुमारे ५.५ लाख हेक्टर देवस्थान इनाम जमिनी असल्याचा अंदाज आहे. या जमिनींच्या मालकी, वापर, वहिवाट आणि अतिक्रमणासंबंधी अनेक दशकांपासून विविध प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे नवीन कायदा राज्यातील लाखो शेतकरी, हजारो देवस्थान संस्था आणि स्थानिक प्रशासनासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

### पुढच्या ४८ तासांत मान्सून

असलेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे तापमान कमी झाले असून कडक उन्हापासून दिलासा मिळाला आहे. आता मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्याचा काही भाग आणि संपूर्ण विदर्भासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नाशिक, पुणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि अहमदनगर येथे मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. संभाजीनगर, बीड, बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातही पावसाचा अंदाज आहे. विदर्भात काही ठिकाणी मुसळधार, तर मराठवाड्यात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये सध्या उष्णता आणि दमटपणा जाणवत आहे. मुंबईत कमाल तापमान सुमारे ३५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले असून, वाढलेल्या दमटपणामुळे लोकांना अस्वस्थ वाटत आहे. यंदा केरळमध्ये मान्सूनचे आगमन काही दिवसांसाठी उशिरा झाले, पण त्यानंतर त्याने वेग पकडला आहे. तो गोवा, कर्नाटक, तामिळनाडू आणि बंगालच्या उपसागराच्या काही भागांमध्ये पोहोचला आहे.

### लक्ष्मण हाके

वक्तव्य केले असून, या विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

माध्यमांशी बोलताना लक्ष्मण हाके यांनी प्रस्थापित राजकारणी आणि धनदांडग्यांवर घणाघाती आरोप केले. ते म्हणाले मी कॉकरोच जनता पार्टीचे पूर्ण समर्थन करतो. प्रस्थापितांना धडा शिकवण्यासाठी कोणताही मोठा कारखानदार किंवा धनदांडगा माणूस कधीच पुढे येणार नाही. ही लढाई देशातील आणि राज्यातील सामान्य तरुणाईलाच लढावी लागणार आहे. हीच तरुण पिढी प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवून देईल आणि या परिवर्तनाच्या लढ्यात मी या तरुणांसोबत जाण्यास पूर्णपणे तयार आहे. गेल्या काही काळापासून ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून लक्ष्मण हाके हे सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहेत. प्रस्थापित राजकारण्यांमुळेच बहुजन आणि ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप त्यांनी वारंवार केला आहे. त्यातच आता त्यांनी थेट 'कॉकरोच जनता पार्टी'ला पाठिंबा जाहीर केल्यामुळे, आगामी काळात राज्यातील प्रस्थापित विरुद्ध बहुजन असा संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

cmyk

cmyk

## शेख जाकेर महेबुब यांना पुरस्कार जाहीर!

बीड (प्रतिनिधी)बीड जिल्हा मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष शेख जाकेर महेबुब यांना यंदाचा मानाचा 'मुस्लिम ओबीसी समाजभूषण नेतृत्व पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने त्यांच्या नावाची एकमुखाने अधिकृत घोषणा केली आहे.साप्ताहिक युवा लोकमित्र' आणि 'युवा लोकमित्र परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय, आदर्शवत व प्रदीर्घ कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. निवड समितीने समाज संघटन, वंचित घटकांचे कल्याण आणि समाजाला खंबीर नेतृत्व देण्याच्या क्षेत्रातील योगदानासाठी शेख जाकेर महेबुब यांची या विशेष पुरस्कारासाठी निवड केली आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.८ जून २०२६


# बीड प्रशासनाच्या दाव्यांचा फुगा फुटला!

### पाणंद रस्ता वादातून महिलेसह शेतकऱ्यांवर हल्ला; काळेगाव हवेलीतील धक्कादायक प्रकार'' | वेळीच कारवाई झाली असती तर घटना टळली असती | पाणंद रस्ते मोकळे करण्याच्या दाव्यांवर डॉ. ढवळे यांचा सवाल

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा प्रशासनाकडून पाणंद रस्ते मोकळे करून शेतकऱ्यांना न्याय दिल्याचा मोठा गाजावाजा केला जात असला, तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे काळेगाव हवेली (ता. बीड) येथे घडलेल्या घटनेतून समोर आले आहे. पाणंद रस्ता मोकळा करण्याच्या कामातून निर्माण झालेल्या वादातून एका महिलेसह शेतकऱ्यांवर हल्ला झाल्याची घटना आज रविवार रोजी सकाळी घडली. काळेगाव हवेली येथील कुंभार वस्तीवरील गट क्रमांक ४२२ व ४२३ मधील शेतरस्ता दि. ४ जून रोजी तहसील प्रशासन व भूमी अभिलेख विभागाने मोकळा करून दिला होता. मात्र त्यावेळी काही व्यक्तींनी रस्ता कामाला विरोध करत महसूल कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा केल्याचा आरोप आहे. याबाबत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दूरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली होती.





मात्र कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

आज दि. ७ जून रविवार रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजण्याच्या सुमारास श्यामसुंदर मोटरकर, संदीप श्यामसुंदर मोटरकर, भगवान रामभाऊ मोटरकर, बद्रीनारायण रामभाऊ मोटरकर, भागवत भगवान मोटरकर व महानंदा श्यामसुंदर मोटरकर यांनी अभिमान शेलार, नंदा शेलार व शिवशर्मा शेलार यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत श्यामसुंदर मोटरकर यांनी अभिमान शेलार यांच्यावर बतईने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता नंदा अभिमान शेलार यांनी तो वार रोखण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांच्या हाताला दुखापत झाली. जखमींना फिर्याद नोंदविण्यासाठी पिंपळनेर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना जिल्हा रुग्णालय, बीड येथे पाठविल्याची माहिती मिळाली आहे. डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनावर टीका करत म्हटले की, ''दि. ४ जून रोजी महसूल व भूमी अभिलेख अधिकाऱ्यांसमोरच रस्ता कामाला विरोध करण्यात आला होता. त्यावेळी संबंधितांवर कारवाई झाली असती तर आजची घटना घडली नसती. शेतरस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाईच्या घोषणा केवळ कागदोपत्रीच असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.या घटनेमुळे पाणंद रस्ते मोकळे करण्याच्या सरकारी मोहिमेच्या अंमलबजावणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## मोफत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण शिबिराला प्रतिसाद



पाटोदा। प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) संलग्न सद्गुरु प.पू. मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट अंतर्गत आणि श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र (दिंडोरी प्रणीत) यांच्या आयोजनातून तळे पिंपळगाव येथील मारुती मंदिरात मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण व सर्व रोगनिदान शिबिराचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला तळे पिंपळगाव आणि परिसरातील ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात गावचे सरपंच सौ नेहा शशिकांत चौरे आणि गावातील ज्येष्ठ मंडळींच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अशा आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेला मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधेचे कौतुक केले.

मान्यवरांची उपस्थिती या प्रसंगी डॉ. गोरकर, श्रीकांत धसे विजयकुमार अंदुरे, संतोष दीक्षित, बाळासाहेब काटवटे, राजेश लवळ यांच्यासह पत्रकार श्री सतीश गर्जे गावातील अनेक प्रमुख नागरिक व ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती. तसेच या शिबिराचा लाभ घेण्यासाठी परिसरातील महिला व पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. विविध आजारांवर तज्ज्ञ वैद्यांचे मार्गदर्शन या शिबिरामध्ये तज्ज्ञ वैद्यांच्या मार्गदर्शनाखाली हृदयविकार, मधुमेह (डायबिटीज), सर्व प्रकारचे कॅन्सर, रक्तदाब, सांध्यांचे विकार, त्वचा विकार, वात विकार, पोटांचे विकार, महिलांचे विकार, मुतखडा, मूळव्याध, कावीळ, लहान मुलांचे विकार आणि मनोविकार अशा विविध आजारांचे मोफत रोगनिदान व तपासणी करण्यात आली.

फअतिशय शिस्तबद्ध नियोजनामुळे हे शिबिर गरजू रुग्णांसाठी अत्यंत फायदेशीर ठरले असून, आयोजकांचे व सेवा केंद्राच्या सर्व सेवेकऱ्यांचे गावकऱ्यांकडून विशेष आभार मानले जात आहेत. यावेळी डॉ मोहनराव गौरकर यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले तसेच शिबीराचे प्रास्ताविक आरोग्य दुत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे यांनी केले.

## शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा -नवनाथ शिराळे

बीड। प्रतिनिधी

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री माननीय सूनेत्राताई पवार तसेच मंत्री माननीय पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे आणि शेतकरी हिताच्या भूमिकेमुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा महत्त्वपूर्ण निर्णय राबविण्यात आला आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे की, ज्या शेतकरी बांधवांकडे दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज



शिल्लक आहे त्यांनी नियमानुसार उर्वरित रक्कम भरून आपले कर्ज खाते नियमित करावे व कर्जमाफीचा लाभ घ्यावा. तसेच सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपल्या बँक खात्यांचे केवायसी () अद्ययावत करून घ्यावे, जेणेकरून योजनेचा लाभ मिळविताना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासन सातत्याने कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी, शेती उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका, सिंचन प्रकल्प, कृषी पायाभूत सुविधा विकास तसेच शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सूनेत्राताई पवार आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना आर्थिक बळकटी देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. शेतीसाठी पायाभूत सुविधा, जलसंधारण, सिंचन क्षमता वाढ, पीक नुकसान भरपाई, कृषी यांत्रिकीकरण आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत यांसारख्या अनेक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांना मोठा आधार मिळत आहे. कर्जमाफीचा निर्णय हा शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय असून त्यातून हजारो शेतकरी कुटुंबांना नव्याने उभारी मिळणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी नमूद केले आहे. तरी सर्व पात्र शेतकरी बांधवांनी संबंधित बँकांशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, आपले केवायसी अद्ययावत करून घ्यावे आणि शासनाच्या या महत्त्वपूर्ण कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त माजलगांवात शिवमय वातावरण

### भव्य पालखी सोहळ्यासह ६२ शिवप्रेमींचे रक्तदान

माजलगांव। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त माजलगांव शहरात शनिवारी (दि. ६ जून) सकाळी १० वाजता विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य पालखी सोहळा काढण्यात आला. शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शहर शिवमय झाले होते. शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून शिवतीर्थ परिसर, एस.टी. बसस्थानक, माजलगांव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास शिवप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ६२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपत मानवतेचा संदेश दिला.* या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असल्याने सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक करण्यात





आले.

पालखी सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, भगवे ध्वज, शिवगर्जना आणि शिवकालीन वेशभूषा यामुळे वातावरण भारावून गेले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या पालखी सोहळ्याने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी रमेश उर्फ गजू चौधरी, अभिजित अशोक जाधव, ज्ञानेश्वर विघ्ने, सचिन कळाळे, लखन सावंत, बाळू ताकट, ऋषिकेश सोळंके, वैभव सोळंके, आदित्य मुळे, यश चुंबळे, वैभव राठोड, आदित्य शिंदे, करण ढगे यांच्यासह असंख्य शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित पालखी सोहळा आणि रक्तदान शिबिरामुळे माजलगाव शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिवरायांच्या विचारांचा जागर करत समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आल्याने नागरिकांनी या कार्यक्रमाचे स्वागत केले.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने एक झाड लावणे गरजेचे -विनायक रत्नपारखी

माजलगाव। प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रदेश भाजपच्या सूचनेनुसार व लोकनेत्या ना.पंकजा मुंडे, माजी खासदार डॉ.प्रीतम मुंडे यांच्या आव्हानानुसार व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली एक पेड मॉ के नाम माजलगाव भाजपाच्या वतीने माजलगाव संपर्क कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपा शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले की निसर्गाचा अर्थातच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने एक वृक्ष लावणे गरजेचेच आहे,जेणेकरून पाऊस देखील वेळेवर पडून मुबलक पडेल व झाडामुळे आवश्यक असणारा ऑक्सिजनचा पुरवठा देखील सर्वांना चांगला मिळेल आणि त्यामुळेच संतांच्या उक्ती प्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे व व्हावया पर्जन्यवृष्टी वृक्षांनी सजवासृष्टी असे सांगितले आहे.

धरतीला आपण माता मानतो मातेचे ऋण फेडल जात नाही तर तिची सेवा केली जाते या भावनेतून आपण सर्वांनी सुजन नागरिक



म्हणून एक वृक्ष लावणे गरजेचे आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमाचे संयोजक भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके म्हणाले आज प्राथमिक स्वरूपात ११ झाडे लावून सुरुवात केली व येणाऱ्या काळात माजलगाव शहरात विविध ठिकाणी वडाच्या झाडासह विविध ऑक्सिजन देणारी झाडाचे वृक्षारोपण करून त्याच्या संगोपन करण्याचे ठरवले आहे.

या वृक्षारोपण कार्यक्रमाच्या प्रसंगी कीट्टी आडगाव मंडळाच्या भाजपा तालुका अध्यक्ष रुपाली कचरे,पात्रुड मंडळाचे तालुकाध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके, डॉ प्रशांत पाटील, भाजपा उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण, नानासाहेब घोडके, माजलगाव शहर सचिव मनोज कोरडे,प्रल्हाद दळवी,नामदेव मुळे, शरद कचरे, किशोर सावंत,रवी गायकवाड,शहर सचिव पूजा मुंडकर,आनिता अलकुंटे,भारती घुबडे,संतोष जाधव,सुभाष कांबळे,रवी वाकळे,सुनील दळवे,भरत जोशी, अजीम पठाण, गोपाळ कुलकर्णी, यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रूपाली कचरे तर आभार प्रदर्शन डॉक्टर अभिजीत सोळंके यांनी केले.

## अकरावी प्रवेश प्रक्रियेत दुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांना पुन्हा संधी- बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये एस एस सी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीच्या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया करावी लागते अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया दरम्यान अर्ज भरताना झालेल्या चुका विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अडथळा ठरत असल्याचे लक्षात आल्यानंतर शिक्षण संचालनालयाने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे पहिल्या प्रवेश फेरीत अर्जातील चुकीच्या माहितीमुळे प्रवेश नाकारण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना आता अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची आणखी एक संधी देण्यात आलेली आहे. या संदर्भातील मार्गदर्शक सूचना राज्यातील सर्व विभागीय उपसंचालक शिक्षण अधिकारी शिक्षण निरीक्षक कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात आलेल्या आहेत अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी नुकतीच पूर्ण झालेली आहे मात्र अर्ज भरताना अनेक विद्यार्थ्याकडून काही तांत्रिक किंवा मानवी चुका झाल्याचे समोर आले आहे मूळ कागदपत्रावरील माहिती आणि ऑनलाइन माहिती या तपशिलामध्ये तफावत आल्यामुळे अनेक महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज नाकारले आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत याप्रकरणी विद्यार्थ्यांनी



पालकाकडून शिक्षण विभागामध्ये अनेक तक्रारी केल्या या तक्रारी गेल्यानंतर माध्यमिक शिक्षण संचालनालयाने विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यानुसार पहिल्या फेरीत प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्जातील चुकीची दुरुस्ती करता येणार आहे पात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आलेला आहे दरम्यान ही माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि पालकापर्यंत पोहोचवून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे निर्देश स्थानिक प्रशासनाला देण्यात आलेले आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या दिलेल्या संधीचा लाभ घ्यावा व पहिल्यापूर्वी प्रवेश करीत नाकारला गेलेला प्रवेश पुढील प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी पूर्ण करून घ्यावा असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे पत्रकार केले आहे.

cmyk

# सौर कृषिपंपांमध्ये महाराष्ट्राने गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

एकूण सौर पंपांमध्ये ६४ टक्के वाटा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे. प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे.

देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये



एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार, उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे. याआधी महाराष्ट्राने महावितरणच्या माध्यमातून मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत एकाच महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याची विश्वविक्रमी कामगिरी केली आहे. त्याची नोंद डिसेंबर २०२५ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये सर्वसाधारण शेतकऱ्यांना केवळ १० टक्के आणि अनुसूचित जाती-जमाती शेतकऱ्यांसाठी केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्स्यावर तीन, पाच व ७.५ अश्वशक्तीचे सौर कृषिपंप देण्यात येत आहेत. सौरपंपाच्या पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होते. त्यामुळे आतापर्यंत १० लाखांवर शेतकऱ्यांची वीजबिलांमधून मुक्तता झाली आहे. तर दिवसा अखंडित वीजपुरवठा मिळत आहे. यासोबतच शेतातील विद्युत अपघातांचा धोकाही पूर्णतः टळला आहे. या सौर पॅनेल्समुळे सिंचनासह शेत घरातील विविध उपकरणे, मोबाईल चार्जिंग व ई-वाहन चार्जिंग करणेही सहज शक्य झाले आहे. तसेच शिल्लक विजेच्या आधारे शेतकऱ्यांना छोटे कृषिपुरक अन्य व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली आहे.

या योजनेतील प्रत्येक सौरपंपाला ५ वर्षांची वॉरंटी देण्यात आली आहे. या कालावधीत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादार एजन्सीवर बंधनकारक आहे. तसेच सोलर पॅनेल्स आणि पंपाचे नुकसान, नैसर्गिक आपत्ती तसेच चोरीविरोधी विमा संरक्षणही उपलब्ध आहे. सौर कृषिपंपाबाबत काही तक्रार असल्यास संबंधित शेतकऱ्यांना महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईट, २४ तास सुरू राहणारे टोल फ्री क्रमांक आणि संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करण्याची सोय उपलब्ध आहे.

## शेतात काम करताना हे ॲप वापरा; १५ मिनिटे आधी मिळेल विजेचा अलर्ट




मान्सून सुरू होताच राज्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचे प्रमाण वाढते आणि अनेकदा वीज पडून जीवितहानीच्या घटना घडतात. मात्र आता तुमचा मोबाईलच तुम्हाला वीज पडण्यापूर्वी सावध करणार आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने विकसित केलेले दामिनी ॲप विजेचा संभाव्य धोका तब्बल १५ मिनिटे आधी सांगते. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि खुल्या जागेत काम करणाऱ्या नागरिकांसाठी हे ॲप जीवदान ठरू शकते.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना व नागरिकांना वेळेत सतर्क करण्यासाठी पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने विकसित केलेले दामिनी लाइटनिंग अलर्ट हे मोबाइल ॲप प्रभावी ठरत आहे. प्रशासनाने नागरिक, शेतकरी, शेतमजूर तसेच खुल्या जागेत काम करणाऱ्या व्यक्तींनी हे ॲप डाउनलोड करून वापरण्याचे आवाहन केले आहे. दामिनी ॲपचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे वीज पडण्याची शक्यता असलेल्या भागाबाबत सुमारे १५ मिनिटे आधी सूचना मिळते. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. हे ॲप जीपीएस तंत्रज्ञानावर आधारित असून वापरकर्त्याच्या सध्याच्या स्थानानुसार परिसरातील विजांच्या हालचालींचे निरीक्षण करते. विजांचा धोका निर्माण होताच ॲपवर तात्काळ सूचना पाठवली जाते.

शेतकऱ्यांसाठी ठरणार जीवनरक्षक : मान्सून काळात शेतकरी मोठ्या प्रमाणात शेतात काम करत असतात. अनेकदा अचानक मेघगर्जना आणि वीज पडण्याच्या घटना घडतात. अशावेळी दामिनी ॲप वेळेवर सूचना देऊन जीवितहानी टाळण्यास मदत करू शकते. विशेषतः शेतकरी, शेतमजूर, बांधकाम कामगार, ग्रामीण भागातील नागरिक, खुल्या जागेत काम करणारे कर्मचारी, प्रवासी आणि पर्यटक यांनी हे ॲप वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ॲपवर मिळणाऱ्या अलर्टच्या आधारे गावातील नागरिकांना त्वरित सूचना दिल्यास वीज पडून होणाऱ्या दुर्घटना टाळता येतील, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दामिनी ॲपची प्रमुख वैशिष्ट्ये : वीज पडण्याची पूर्वसूचना सुमारे १५ मिनिटे आधी. परिसरातील विजांची हालचाल दर्शवते. मोबाईलवर त्वरित अलर्ट. जीवित व वित्तीय नुकसान टाळण्यास मदत. पूर्णपणे मोफत सेवा.

वीज पडत असताना काय करावे? झाडाखाली उभे राहू नका. मोकळ्या मैदानात थांबू नका. मोबाइल चार्जिंगला लावलेला असताना वापर टाळा. विद्युत उपकरणांपासून दूर राहा. सुरक्षित इमारतीत किंवा वाहनात आश्रय घ्या. पाण्याजवळ जाणे टाळा. मान्सून काळात वीज पडण्याच्या घटनांमुळे दरवर्षी अनेकांना जीव गमवावा लागतो. अशा परिस्थितीत दामिनी ॲप हे नागरिकांसाठी एक प्रभावी सुरक्षा साधन ठरू शकते. वेळेवर मिळणाऱ्या अलर्टमुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात.

## जनावरांतील जीवघेणा 'घटसर्प' आजार आणि उपाय!

राज्यात काही भागात सध्या जनावरात घटसर्प आजाराचा प्रसार झाला असून यामुळे जनावरे दगावली आहेत. घटसर्प या आजाराला हेमोरॅजिक सेप्टिसिमिया तसेच डिप्थीरिया या नावाने सुद्धा ओळखतात. वातावरणातील बदलाचा परिणाम हा जनावरांवर देखील पाहवयास मिळतो. पावसाळ्याच्या तोंडावर घटसर्प ह्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. विशेषत: गाई आणि म्हशीमध्येच याची लक्षणे आढळतात. शिवाय हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा फैलावही लवकर होतो. यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याचाही धोका असतो. त्यामुळे वेळीच लसीकरण करुन घेणे हाच यामधील सर्वोत्तम पर्याय आहे.

घटसर्प रोगाच्या प्रादुर्भावाची कारणे : पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी हा आजार अधिक प्रमाणात आढळतो. शिवाय अस्वच्छ असलेल्या ठिकाणी जनावरे बांधली किंवा लांबचा प्रवास किंवा अतिकाम करून थकलेल्या प्राण्यांवर या आजाराचे जीवाणू हल्ला करतात. रोगाचा प्रसार खूप वेगाने होतो. आजारी जनावरांचा चारा, धान्य आणि पाणी यांचे सेवन आणि इतर जनावरे संपर्कात आली तर हा आजार होतोच. तसेच मादी प्राण्याच्या दुधाने त्याचा प्रसार होतो.

घटसर्प आजाराची लक्षणे : जनावरांना तीव्र ताप येतो, सुमारे १०५ ते १०६ डिग्री फॅ. पर्यंत हा ताप जातो. डोळे लाल आणि सुजलेले




दिसतात, नाक, डोळे आणि तोंडातून स्त्राव वाहतो. मान, डोके किंवा पुढील पायांच्या दरम्यान सूज येते. श्वास घेताना पुटपुटण्याचा आवाज येतो, श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरून जनावरांचा मृत्यू सुद्धा होतो.घटसर्प आजारावर उपचार : या आजारावर त्वरित उपचार करणे गरजेचे आहे. अन्यथा जनावराचा यामध्ये मृत्यूही होऊ शकतो. घटसर्पची लक्षणे आढळून आल्यास लागलीच पशूवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य ती उपाययोजना करावी. जनावरांना दरवर्षी पावसाळयापूर्वी आजाराची लस जवळच्या पशुवैद्यक दवाखान्यात द्यावी. पावसळ्यापूर्वी लसीकरण करणे गरजेचे आहे. जनावरांना घटसर्प आजाराची लक्षणे दिसताच बाधित जनावरांना इतर निरोगी प्राण्यांपासून जनावर वेगळे करावे. आजारी जनावरांना नदी, तलाव, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी पिऊ देऊ नका. बाधित जनावराच्या आधी निरोगी जनावरांना चारा, धान्य, पाणी इत्यादी द्यावे.

## जनावरांच्या शरिरावील किडी आणि नियंत्रण पद्धती

दूध देणाऱ्या जनावरांच्या शरीरावर येणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव हा शेतकऱ्यांसाठी एक गंभीर समस्या बनली आहे. किडीमुळे जनावरांना होणाऱ्या त्रासामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे दुधाच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. ही समस्या केवळ आर्थिकदृष्ट्या नुकसानकारकच नाही तर जनावरांच्या निरोगी जीवनावरही गंभीर परिणाम घडवते. दुधाळ जनावरांच्या स्वास्थ्यावर आघात करणारे कीटक म्हणजे गोचीड, माइट्स, उवा, माश्या, आणि पिसवा यांसारख्या कीटकांनी जनावरांच्या शरीरावर आक्रमण केल्याने त्यांचे जीवन तणावग्रस्त बनते.

गोचीड :गोचीडमुळे जनावरांमध्ये बाबेशिओसिस आणि अनाप्लास्मोसिस सारखे गंभीर रोग पसरू शकतात. या रोगांमुळे जनावरांची रोगप्रतिकारक क्षमता कमी होते, ताप येतो, रक्तातील लाल पेशींची संख्या कमी होते आणि अशक्तपणा येतो. अकारिसाइड्सचा वापर करून टिक्स नियंत्रण केले जाते. हे रसायन विविध स्वरुपात उपलब्ध असतात, जसे की डिप्स, स्प्रे, किंवा पोर-ऑन. या रसायनांचा योग्य वापर करून टिक्सच्या वाढीला आळा घालता येतो. टिक्सच्या नैसर्गिक शत्रूंना प्रोत्साहन देऊन त्यांचे नियंत्रण केले जाऊ शकते. जसे की पक्षी, जे टिक्स खाऊन त्यांची संख्या कमी करतात. तसेच, काही बुरशी टिक्सवर परिणामकारक आहेत.

माइट्स :माइट्समुळे त्वचेची खाज, जळजळ, आणि जखम होण्याची शक्यता असते. जनावरांमध्ये या समस्येमुळे उत्पादन क्षमता कमी होऊ शकते आणि त्यांची शारीरिक स्थिती खालावू शकते. माइट्स नियंत्रणासाठी विशिष्ट रसायनांचा वापर करावा, जसे की माइटीसाइड्स, जे स्प्रे, डिप्स किंवा टॉपिकल उपचारांच्या स्वरुपात वापरले



जातात. जनावरांच्या निवास स्थानांची नियमित साफसफाई आणि निर्जंतुकीकरण करून माइट्सच्या प्रसाराला आळा घालता येतो. संक्रमित जनावरांना इतर जनावरांपासून वेगळे ठेवल्याने माइट्सचा प्रसार थांबवता येतो.

ऊवा/ जूं :जूंमुळे जनावरांमध्ये खाज, त्वचेची हानी आणि रक्ताल्पता (ॲनिमिया) होऊ शकते. खाजेमुळे जनावरांची एकाग्रता कमी होते, ज्यामुळे त्यांच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. नियंत्रणासाठी कीटकनाशक पावडर, स्प्रे किंवा पोर-ऑनचा वापर करावा. या उपायांनी जूंचा नाश होतो आणि त्यांच्या पुनरावृत्तीला आळा बसतो. जनावरांची नियमित निगा राखणे, स्वच्छता करणे, आणि नियमितपणे त्यांची तपासणी करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जनावरांच्या केसांचा योग्य प्रकारे धुवून स्वच्छता राखल्याने जूंमुळे होणारा त्रास कमी होतो. प्रभावित जनावरांना इतर जनावरांपासून वेगळे ठेवल्याने या कीटकांचा प्रसार रोखता येतो.

माश्या :माश्यांमुळे जनावरांना त्रास होतो, ताण येतो, आणि मॅस्टिटिससारख्या रोगांचा प्रसार होऊ शकतो. माश्यांचे चावणे आणि त्यांच्या सततच्या उपस्थितिमुळे जनावरांना खूप त्रास होतो, ज्यामुळे त्यांच्या दुधाच्या उत्पादनावर नकारात्मक परिणाम होतो. माश्यांचे नियंत्रण करण्यासाठी कीटकनाशक स्प्रे, पोर-ऑन किंवा इअर टॅग्स वापरण्यात येतात. हे रसायने माश्यांच्या प्रजनन आणि वासस्थाने कमी करण्यासाठी प्रभावी आहेत. माश्यांच्या अळ्यांवर आक्रमण करणारे परजीवी कीटक यांचा वापर करून माश्यांची संख्या कमी करता येते. जनावरांच्या निवास स्थानांमध्ये साठलेला खत आणि कचरा योग्य पद्धतीने व्यवस्थापित केल्याने माश्यांच्या प्रजननाचे ठिकाण कमी होते, ज्यामुळे त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवता येते.

पिसवा :पिसव्यांमुळे जनावरांना खाज, त्वचेची जळजळ आणि विविध रोगांचा प्रसार होऊ शकतो. पिसव्यांच्या चाव्यामुळे त्वचेवर खाज आणि जखम होऊ शकते, ज्यामुळे जनावरांना अत्यंत अस्वस्थता येते. पिसव्यांचे नियंत्रण करण्यासाठी पिसू पावडर, स्प्रे किंवा डिप्सचा वापर केला जातो. हे रसायन पिसव्यांचा नाश करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. जनावरांच्या राहण्याच्या ठिकाणांची नियमित साफसफाई आणि निर्जंतुकीकरण केल्याने पिसव्यांची संख्या कमी करता येते. जनावरांच्या बिछान्याची देखील स्वच्छता करणे गरजेचे आहे. पिसवांच्या अळ्या आणि अंड्यांचा नाश करण्यासाठी वातावरणाचे उपचार करा. हे उपचार पिसवांच्या पुनरावृत्तीला रोखण्यासाठी महत्त्वाचे आहेत.इतर शिफारसी : निंबोळी तेल एक नैसर्गिक कीटकनाशक आहे, ज्याचा वापर टिक्स, माइट्स, आणि जूं यांच्यावर प्रभावी ठरतो. हे रसायनविरहित आणि पर्यावरणपूरक उपाय आहे. पारंपरिक हर्बल उपचार जसे की हळद आणि मोहरीच्या तेलाचे मिश्रण, जनावरांच्या त्वचेवरील किडींचा नाश करण्यासाठी वापरले जाऊ शकते. ग्रामीण भागात माश्या आणि इतर किडींपासून जनावरांना दूर ठेवण्यासाठी गाईच्या शेणाची राख लावणे एक पारंपरिक पद्धत आहे. ही राख किडींना दूर ठेवण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२४ : पेरू येथे भूकंप.
१६५८ : मुघल शासक औरंगजेब यांनी आग्र्याचा किल्ला काबीज केला
१६७० : पुरंदरच्या तहात गमावलेला रोहिडा किल्ला शिवाजी महाराजांनी परत जिंकून घेतला.
१७०७ : औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुअज्जम आणि आझमशाह या त्याच्या दोन मुलांमधे दिल्लीच्या तख्तासाठी युद्ध झाले. यात मुअज्जमने आझमशाहला ठार करुन दिल्लीची गादी बळकावली.
१७१३ : मुघलांनी १६८९ मधे जिंकलेला रायगड किल्ला पंतप्रतिनिधी यांनी सिद्दीकडुन राजकारणाने जिंकुन घेतला.
१७८३ : आईसलँड मधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक, हजार ठार.
१९१२ : कार्ल लेम्ले यांनी यूनिव्हर्सल पिक्चर्स या कंपनीची स्थापना केली.
१९१५ : टिळकांनी मंडाले तुरुंगात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून पुर्ण केला.
१९१५ : लो. टिळक यांचे मंडालेच्या तुरुंगातून सुटका.
१९१८ : नोव्हा ॲक्विला या सर्वाधिक तेजस्वी तेजोमेघाचा शोध.
१९४१ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी सीरीया व लेबानॉन पादाक्रांत केले.
१९४८ : भारत व इंग्लंड यांच्या दरम्यान एअर-इंडियाची हवाई सेवा सुरु.
१९४८ : जॉर्ज ऑर्वेलची १९८४ या नावाची कांदबरी प्रसिद्ध झाली.
१९५३ : कृष्णवर्णीयांना हॉटेलमधे सेवा नाकारण्यास अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली.
१९६८ : बर्मोडा देशाने संविधान अंगिकारले.
१९६९ : लष्करप्रमुख म्हणून सॅम माणेकशा यांची नियुक्ती.
१९९२ : पहिल्यांदा जागतिक महासागर दिन साजरा केला गेला.
२००४ : आधुनिक काळातील शुक्राचे (सूर्यावरुन) पहिले अधिक्रमण झाले. याआधीचे अधिक्रमण १८८२ या वर्षी झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०६ : भारतीय क्रिकेट खेळाडू सैयद नझीर अली यांचा जन्म.
१९१० : दिनकर केशव बेडेकर, तत्त्वचिंतक, समीक्षक, लेखक (मृत्यू: २ मे १९७३)
१९१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट २०१५)
१९१७ : गजाननराव वाटवे, भावगीत गायक आणि संगीतकार. (मृत्यू: २ एप्रिल २००९)
१९२१ : इंडोनेशिया देशाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष सुहार्तो यांचा जन्मदिन.
१९२५ : बार्बरा बुश, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुशची पत्नी व जॉर्ज डब्ल्यु. बुशची आई.
१९३२ : सैयद नझीर अली, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भैतिकशास्त्रज्ञ केनिथ गेडीज विल्सन यांचा जन्म.
१९५५ : वर्ल्ड वाईड वेब चे जनक टिम बर्नर्स-ली यांचा जन्म.
१९५७ : चित्रपट अभिनेत्री डिंपल कपाडिया यांचा जन्म.
१९७५ : शिल्पा शेट्टी, भारतीय अभिनेत्री आणि निर्माता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३२ : इस्लाम धर्माचे संस्थापक मोहंमद पैगंबर यांचे निधन.
१७९५ : फ्रान्सचा राजा लुई १७ वा यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १७८५)
१८०९ : अमेरिकन विचारवंत राजकारणी थॉमस पेन यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १७३७)
१८४५ : अमेरिकेचे वे७ राष्ट्राध्यक्ष ॲन्ड्रयू जॅक्सन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १७६७)
१९९५ : रंगभूमी कलावंत एकपात्री प्रयोगकार राम नगरकर यांचे निधन.
१९९८ : नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष सानी अबाचा यांचे निधन.
२००९ : लोकप्रिय भारतीय उर्दू-हिंदी नाटककार, चित्रपट दिग्दर्शक, कवी आणि अभिनेता हबीब तनवीर यांचे निधन.

## चार जिल्ह्यांतील २२ हजार शेतकऱ्यांना दिलासा!

पुणे / प्रतिनिधी

अवकाळी पावसाने मार्च २०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर विभागातील चार जिल्ह्यांत शेतपिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी १६ कोटी ७१ लाख ५९ हजार रुपये वितका निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. ही मदत २२ हजार शेतकऱ्यांना मिळणार आहे.

मार्च महिन्यात मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना गारपिटीसह अवकाळी पावसाचा तडाखा बसला होता. यामुळे गहू आणि फळपिकांचे नुकसान झाले होते. तसेच नागपूर विभागातही नुकसान झाले होते. यानंतर छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर विभागीय आयुक्तांनी शेतपिकांच्या नुकसानीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार १६ कोटी ७१ लाख रूपये इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. अवकाळी पावसाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १७,२१६ शेतकऱ्यांचे ७,५५७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. तर बीड जिल्ह्यातील ५६९ शेतकऱ्यांचे २२६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. या दोन जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी मिळून १२ कोटी ३० लाख रुपये इतकी मदत मंजूर करण्यात आली आहे. तर नागपूर विभागातील गोंदिया जिल्ह्यातील ४६५ शेतकऱ्यांचे १८५ हेक्टवरील आणि गडचिरोलीतील ३,८७३ शेतकऱ्यांचे २,४०६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते.

त्यांना ४ कोटी ४० लाख रुपये मदत मिळणार आहे. ही मदत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पोर्टलद्वारे लाभार्थ्यांच्या थेट त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात येणार आहे. खरीप २०२५ व या पुढील कालावधीसाठी केंद्र व राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतपीक नुकसानीबाबत द्यावयाचे निविष्ठा अनुदानाचे दर व निकष शासन निर्णय २७ मार्च २०२३ प्रमाणे देय राहतील, असे नमूद करण्यात आले आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# घरकुलाच्या नावाखाली सुरु असलेल्या अवैध वाळू उपशाची एसआयटी कडून चौकशी करा - आ.विजयसिंह पंडित

## गेवराई तहसिलदारांच्या नेतृत्वात १०० कोटी रुपयांचे सिंडीकेट सुरु

बीड। प्रतिनिधी

घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करण्याच्या नावाखाली गोदावरी नदीपात्रात लाखो ब्रास वाळूचे अवैध उत्खनन होत असून या अवैध वाळू उपशाची एसआयटी कडून चौकशी करावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी केली असून शासन धोरणाचा गैरफायदा घेऊन गेवराई तहसिलदारांच्या नेतृत्वात गोदावरी नदीपात्रात सुमारे १०० कोटी रुपयांचे वाळू उपसा सिंडीकेट सुरु असल्याचा आरोप आ. विजयसिंह पंडित यांनी केला आहे. दोषींविरुध्द कारवाई होईपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथून घरकुल बांधकामाच्या नावावर गोदावरी नदीपात्रातून सुरु असलेल्या अवैध वाळू उपसा प्रकरणी शनिवार, ६ जून रोजी आ. विजयसिंह पंडित यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या प्रकरणात सुमारे १०० कोटी रुपयांचे तहसिलदारांच्या नेतृत्वात महसुल व पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांचे वाळू माफियांसह सिंडीकेट कार्यान्वित असल्याचा गंभीर आरोप त्यांनी यावेळी केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, शासनाच्या विविध योजनेतून मंजुर घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू उपलब्ध करून देण्याचे शासन धोरण आहे. गेवराई तालुक्यातील श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथून सध्या घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून दिले जाते. गेवराई पंचायत समितीसह बीड जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांकडून याठिकाणी सुमारे १६०० लाभार्थ्यांची यादी तहसिलदारांना देण्यात आली आहे. यादीतील नमुद संख्येप्रमाणे आठ हजार ब्रास वाळू उपसा होणे अपेक्षित असतानाही सध्या नदीपात्रातून लाखो ब्रास वाळू दिवसाढवळ्या उपसा केली जात आहे. अजस्त्र यंत्रसामग्री आणि शेकडो टिप्परच्या माध्यमातून वाळू उपसा आणि वाहतुक होत आहे. राक्षसभुवन येथील स्मशानभुमी, दशक्रिया विधीची जागा, मंडप व्यावसायिकांची जागा यांसह परिसरातील पुरातन मंदिराच्या जागांना या वाळू उपशामुळे क्षती पोहोचली आहे.

अनेक सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व राक्षसभुवन ग्रामस्थांनी या बाबत तक्रारी करूनही मुजोर अधिकाऱ्यांनी विशेषतः तहसिलदार, गेवराई यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप आ. विजयसिंह पंडित यांनी केला आहे. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, सध्या गेवराईचे तहसिलदार गोदावरी नदीपात्रात ठान मांडून बसले आहेत. घरकुल लाभार्थ्यांचे ओटीपी गोळा करण्यासाठी त्यांनी दलालांची मोठी फौज दिमतीला ठेवली आहे. अनेकठिकाणी घरकुल लाभार्थ्यांना अंधारात ठेऊन तर अनेकांना ठराविक रक्कम देऊन ओटीपी मिळविण्याचा उद्योग या यंत्रणेकडून केला जातो. रात्री सहानंतर सर्रास अशा प्रकारचा वाळू उपसा पोलीस आणि तहसिलद प्रशासनाच्या उपस्थितीत केला जातो.

वाळू माफियांपैकी जे लोक तहसिलदारांना या प्रकरणात सहकार्य करत नाहीत त्यांचे वाहने जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होत असल्याचा तक्रारी अनेकांकडून प्राप्त होत आहेत. या सर्व गंभीर प्रकरणाची आपण दखल घेऊन या बाबत विशेष एसआयटी कडून तपास करण्याची मागणी शासनाकडे लेखी पत्राद्वारे केली असून याचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचेही आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे तहसिलदारांसह वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

## थोडक्यात



### विधान परिषद सभापती राम शिंदे यांचा सत्कार

जालना। प्रतिनिधी

जालना शहरामध्ये महाराष्ट्र राज्याचे विधान परिषदेचे सभापती मा ना श्री प्रा राम शिंदे यांचा शिवसेना नेते मा मंत्री विधिमंडळ अंदाज समिती प्रमुख तथा आमदार मा श्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या दर्शना निवासस्थानी सदिच्छा भेट देतांना त्यावेळेस त्यांचा येथे सत्कार करताना शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख तथा मा जि.प.अध्यक्ष मा श्री पंडित दादा भुतेकर त्यावेळेस मा नगराध्यक्ष मा श्री भास्करराव अंबेकर , अनिरुध्दजी खोतकर , शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेबजी घुगे, त्यावेळेस उपस्थित मान्यवर होते.



**जालना : महानगरपालिका महापौर श्रीमती वंदनाताई मगरे यांची मा जि प अध्यक्ष सौ आशाताई पंडित दादा भुतेकर यांच्या घरी सदिच्छा भेट देतांना त्यावेळेस उपस्थित शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख मा श्री पंडित दादा भुतेकर तसेच रवींद्र भुतेकर उपस्थित मान्यवर दिसत आहे.**

### पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची मनपा पदाधिकाऱ्यांकडून पाहणी

जालना : शहरात पावसाळ्यात पाणी तुंबणे, नाल्यांमध्ये अडथळे निर्माण होणे आणि नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागू नये, यासाठी मनपाकडून प्रमुख नाल्यांची साफसफाई आणि गाळ काढण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांचा आढावा घेण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी विविध भागांना भेट देऊन प्रत्यक्ष स्थितीची पाहणी केली. यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्वच्छता विभाग प्रमुख नीलेश शंकरपल्ली, संजय वाघमारे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान क्रांती नगर, संग्राम नगर, हनुमान घाट, सेंट मेरी परिसर, कन्हैया नगर, सोरटी नगर तसेच शहरातील इतर प्रमुख नाल्यांची तपासणी करण्यात आली. अनेक ठिकाणी नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले.



## घनश्यामदास गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड

जालना। प्रतिनिधी



कालिका स्टील कंपनीचे संचालक, उद्योगपती, समाजसेवक आणि धर्मप्रेमी मा. श्री घनश्यामदासजी गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे जालना जिल्ह्यासह बीड, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, परभणी अग्रवाल समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अखिल भारतीय अग्रवाल कॉन्फरन्सच्या नव्याने स्थापन झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीत नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष बसंतजी मित्तल, राष्ट्रीय महासचिव गोपालजी गोयल तसेच अन्य राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी देशभरातील समाजकार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आणि विविध क्षेत्रांत सक्रिय असलेल्या व्यक्तींना जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत. त्याच अनुषंगाने घनश्यामदासजी गोयल यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रात त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य, समाजाच्या उन्नतीसाठी घेतलेले पुढाकार तसेच विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये सातत्याने दिलेले योगदान याची दखल घेत त्यांची या महत्त्वाच्या पदावर निवड करण्यात आली आहे. घनश्यामदासजी गोयल यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक संस्था, अग्रवाल समाज बांधव, मित्रपरिवार आणि कुटुंबीयांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात पुढे जाईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आचरणात आणण्याची गरज–ज्योती गाडे

अहिल्यानगर। प्रतिनिधी

''छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती–धर्मातील लोकांना सोबत घेऊन लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय असे रयतेचे राज्य निर्माण केले. समाजातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे, महिलांचा सन्मान राखणे, शेतकरी व कष्टकरी वर्गाला न्याय देणे तसेच सुशासन निर्माण करणे हा शिवरायांच्या राज्यकारभाराचा मूलमंत्र होता. म्हणूनच आज शेकडो वर्षांनंतरही त्यांचे कार्य संपूर्ण जगासाठी आदर्श मानले जाते. छत्रपती शिवरायांचा इतिहास केवळ स्मरणात ठेवण्याचा नसून, तो आपल्या आचरणात आणण्याची खरी गरज आहे, असे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी केले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अहिल्यानगर मनपातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भव्य अभिवादन करण्यात आले. उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झालेल्या या सोहळ्यात शिवरायांच्या अलोट कार्याचा गौरव करण्यात आला, तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करून स्वराज्याच्या आदर्शांना वंदन करण्यात आले. या प्रसंगी महापौर गाडे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दीपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप आदी मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महापौर गाडे म्हणाल्या, रायगड किल्ल्यावर पार पडलेला सोहळा हा केवळ एका राजाचा राज्याभिषेक नव्हता, तर तो मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा, आत्मसन्मानाचा आणि स्वातंत्र्याचा विजय होता. या ऐतिहासिक घटनेमुळे मराठी अस्मितेला नवे बळ मिळाले. राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवा ही मूल्ये अंगीकारूनच आपण शिवरायांना खरी आदरांजली वाहू शकतो,'' असे आवाहन महापौरांनी केले. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर यांनी आपल्या शुभेच्छा भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानासाठी घेतलेल्या कडक भूमिकेचे स्मरण केले. शिवरायांचे लोककल्याणकारी निर्णय आजही राज्यकर्त्यांना प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले. उपसभापती वर्षा सानप यांनी शिवरायांच्या राष्ट्रनिर्माणातील अथांग योगदानाचा गौरव केला. स्वराज्याच्या स्थापनेसाठी मावळ्यांनी केलेला संघर्ष आणि समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याची शिवरायांची शिकवण आजही आपल्यासाठी दिशादर्शक आहे. या संपूर्ण सोहळ्यादरम्यान उपस्थितांनी दिलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' या गगनभेदी जयघोषाने पालिकेचा परिसर दुमदुमून गेला होता.

## कर्जमाफीच्या जीआरची शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने होळी

### बच्चू कडूने आमदारकीसाठी शेतकऱ्याला धोका दिला– राजेंद्र आमटे



बीड। प्रतिनिधी

नागपूरच्या शेतकरी कर्जमाफी आंदोलनानंतर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळेल अशी अपेक्षा होती परंतु शासनाने काढलेल्या कर्जमाफीच्या शासन निर्णयामध्ये अनेक अशा जाचक अटी लादण्यात आलेले आहेत यामुळे शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत याचा निषेध म्हणून शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने खांडे पारगाव येथे शासनाच्या कर्जमाफी जीआर ची होळी करण्यात आली.

संपूर्ण शेतकऱ्याला अपेक्षा होती की शेतकऱ्याची कर्जमाफी होऊन शेतकऱ्याचा सातबारा कोरा होईल व शेतकऱ्याला दिलासा मिळेल या हेतूने नागपूर येथे शेतकऱ्यांच्या वतीने कर्जमाफीचा आंदोलन करण्यात आलं. या कर्जमाफी आंदोलनामध्ये शेतकऱ्यांच्या वतीने सरकारला धारेवर धरण्याकरिता बच्चू कडू यांच्यावर शेतकऱ्यांनी विश्वास दाखवला परंतु शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करण्याऐवजी बच्चू कडून स्वतःच्या आमदारकीचा विचार करून शेतकऱ्याच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला व शेतकरी कर्जमाफी आंदोलनामध्ये आमदारकीची दलाली खाऊन शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडण्याचे काम बच्चू कडू ने करण्यात आलेला आहे त्यामुळे शासनाने काढलेल्या कर्जमाफी शासन निर्णयामध्ये ८० ते ९० टक्के शेतकरी हे कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत याचा निषेध म्हणून शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने खांडे पारगाव येथे कर्जमाफी शासन निर्णयाची शेतकऱ्याच्या वतीने होळी करून जाहीर निषेध करण्यात आला व तात्काळ शासनाने कर्जमाफीच्या निर्णयामध्ये ज्या काही अटी शर्ती शेतकऱ्यावर लादलेले आहेत त्या अटी शर्ती बाजूला काढून सर्वसामान्य शेतकऱ्याला कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा अशी पद्धतीची मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, माणिक आमटे, सुभाष काळे ,सुभाष सपकाळ, नवनाथ सपकाळ, बबन आमटे, संजय आमटे, प्रदीप आमटे ,भिवाजी धारवाडकर, पिनु आमटे, रवी सपकाळ, प्रकाश काळे, दामोदर आमटे, दिलीप झणझणे, महादेव झणझणे, नवनाथ बुरांडे, हनुमान अवघड, लक्ष्मण आमटे, अर्जुन अवघड, बाळू आमटे आदी उपस्थित होते

# नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कौशल्याभिमुख व्हा

## सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्रांतीमुळे ऊर्जा क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेल्या डेटा सेंटर्समुळे विजेची मागणी झपाट्याने वाढणार आहे. त्यानुसार आपली पायाभूत सुविधा व कौशल्य वाढवावे लागेल. कुशल मनुष्यबळामुळे माहिती तंत्रज्ञान क्रांतीचा जसा फायदा देशाला झाला, तसाच एआय क्रांतीचा फायदा करून घ्यायचा असेल सर्व कर्मचाऱ्यांनी कौशल्याभिमुख व्हावे, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) यांनी केले.




महावितरणचा २१ वा वर्धापन दिन छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदित्य जीवने (भाप्रसे) बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता दीपक कुमठेकर होते. यावेळी अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, महेश पवार, विजय मोरे, बीना सावंत, शुभांगी कटकधोंड, सहायक महाव्यवस्थापक शंकर कुलकर्णी, शिल्पा काबरा यांची प्रमुख उपस्थिती होती. सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) म्हणाले की, जगभर नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढतोय. देशाची स्थापित वीज निर्मिती क्षमता ५०० गिगावॅटवर गेली असून त्यात नवीकरणीय ऊर्जेचा ५२ टक्के वाटा आहे. त्यात महावितरणचेही मोठे योगदान आहे. मात्र नवीकरणीय ऊर्जेचे महावितरणच्या यंत्रणेशी एकात्मीकरण करावे लागणार आहे. आज तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. या बदलाशी सुसंगत असे मनुष्यबळ व कौशल्यांचे अद्ययावतीकरण करून ऊर्जा क्षेत्रात नवीन काय सुरू आहे याकडे लक्ष द्यावे लागेल. कौशल्यांचे एकात्मीकरण हे आता माणसाचे सर्वात मोठे कौशल्य आहे, असे जगप्रसिद्ध लेखक युवाल नोआ हरारी यांनी म्हटले आहे. कौशल्याभिमुखता हा गुण दैनंदिन कामकाजाबरोबर वैयक्तिक आयुष्यातही उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे स्वयंप्रेरणेने काम करून ग्राहकांचा आपल्यावरचा विश्वास कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन जीवने यांनी केले. या प्रसंगी मुख्य अभियंता दीपक कुमठेकर म्हणाले की, महावितरणने २१ वर्षांत केलेली प्रगती उल्लेखनीय असून स्पर्धेच्या युगात सक्षम होण्यासाठी कर्मचाऱ्यांनी अधिक जोमाने काम करणे काळाची गरज आहे. चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वत:पासून करा. संकल्पाला कृतीची जोड द्या. ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा व सर्वोत्तम सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी केले. वर्धापन दिन कार्यक्रमात सर्वांनी सुरक्षा शपथ घेतली. मेडीकव्हर हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच कार्यालयाच्या आवारात आयुर्वेदिक वनस्पतींचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमाला महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हाताळणमध्ये वादळी वारा, गारपीट व मुसळधार पावसाचा तडाखा

## शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान, माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी केली पाहणी; तातडीच्या मदतीची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हाताळण गावासह परिसरात ५ जून रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि सुसाट वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. मोठ्या मेहनतीने उभी केलेली पिके, फळबागा आणि साठवून ठेवलेले कृषी उत्पादन काही क्षणांत उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी होत आहे.

हाताळण येथील शेतकरी ज्ञानेश्वर दिलीप गांगर्डे यांनी मोठ्या कष्टाने दोन एकर क्षेत्रात कांद्याचे पीक घेतले होते. अनुकूल वातावरणामुळे त्यांना यंदा चांगले उत्पादन





मिळाले होते. जवळपास ६०० गोणी दर्जेदार कांदा त्यांनी साठवून ठेवला होता. मात्र ५ जून रोजी अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने त्यांच्या कांद्याच्या वखारीचे मोठे नुकसान झाले. वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे वखार कोसळून त्यामध्ये साठवून ठेवलेला संपूर्ण कांदा पावसाच्या पाण्यात भिजला. त्यामुळे कांद्याची गुणवत्ता घसरून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

याच नैसर्गिक आपत्तीमध्ये गावातील फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. शेतकरी बाळासाहेब सांबर यांच्या जांभूळ बागेचे तसेच इतर शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गारपिटीमुळे फळांची गळती होऊन उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्या असून शेतीमाल जमीनदोस्त झाला आहे.या घटनेची माहिती मिळताच माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी तातडीने महसूल प्रशासनाशी संपर्क साधून नुकसानग्रस्त भागाचा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या पाठपुराव्यानंतर तहसील प्रशासनाने घटनास्थळी भेट देत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीची पाहणी करून पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू केली. त्यानंतर माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी प्रत्यक्ष हाताळण येथे जाऊन नुकसानग्रस्त शेतकरी ज्ञानेश्वर गांगर्डे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना धीर देत शासनाकडे योग्य मदतीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.यावेळी बोलताना दरेकर म्हणाले, शेतकरी वर्षभर राबून, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि भविष्याची स्वप्ने डोळ्यासमोर ठेवून शेती करतो. मात्र निसर्गाच्या एका तडाख्याने त्याचे सर्व कष्ट मातीमोल होतात. हातातोंडाशी आलेले पीक आणि साठवून ठेवलेला कांदा एका रात्रीत उद्ध्वस्त झाला आहे. शासनाने या नुकसानीची गंभीर दखल घेऊन तातडीने आर्थिक मदत द्यावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे हाताळण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून नुकसानग्रस्तांना त्वरित मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावून घेणाऱ्या या नैसर्गिक संकटामुळे पुन्हा एकदा शेती व्यवसायाच्या असुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासनाने तातडीने विशेष मदत जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज असल्याचे मत परिसरातून व्यक्त होत आहे.

# भाटवडगाव येथे घरफोडी

## दागिन्यासह रोख रक्कम २ लाख ७ हजार रुपयांचा ऐवज लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील भाटवडगाव परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख ७ हजार चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार दि.४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यापासून ते दि.५ जून २०२६ रोजी दुपारी ४.३० वाजेच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली.भाटवडगाव येथील पूर्वा जिनिंगजवळील घराला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले.घर बंद असल्याची संधी साधत चोरट्यांनी घराच्या दरवाज्याचा कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला. यानंतर घरातील कपाटाचे लॉक तोडून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण २ लाख ७ हजार रुपये चोरून नेले.चोरीची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली.फिर्यादी बाळासाहेब रोडगे यांच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १८७/२०२६ अन्वये कलम ३०५ (अ),३३१(३)व ३३१ (४) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कर्जमाफीच्या जीआरची शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने होळी

## बच्चू कडूने आमदारकीसाठी शेतकऱ्यांना धोका दिला -राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

नागपूरच्या शेतकरी कर्जमाफी आंदोलनानंतर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळेल अशी अपेक्षा होती परंतु शासनाने काढलेल्या कर्जमाफीच्या शासन निर्णयामध्ये अनेक अशा जाचक अटी लादण्यात आलेले आहेत यामुळे शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत याचा निषेध म्हणून शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने खांडे पारगाव येथे शासनाच्या कर्जमाफी जीआर ची होळी करण्यात आली.

संपूर्ण शेतकऱ्याला अपेक्षा होती की शेतकऱ्याची कर्जमाफी होऊन शेतकऱ्याचा सातबारा कोरा होईल व शेतकऱ्याला दिलासा मिळेल या हेतूने नागपूर येथे शेतकऱ्यांच्या वतीने कर्जमाफीचा आंदोलन करण्यात आलं. या कर्जमाफी आंदोलनामध्ये शेतकऱ्यांच्या वतीने सरकारला धारेवर धरण्याकरिता बच्चू कडू यांच्यावर शेतकऱ्यांनी विश्वास दाखवला परंतु शेतकऱ्यांच्या हिताचा विचार



करण्याऐवजी बच्चू कडून स्वतःच्या आमदारकीचा विचार करून शेतकऱ्याच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला व शेतकरी कर्जमाफी आंदोलनामध्ये आमदारकीची दलाली खाऊन शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडण्याचे काम बच्चू कडू ने करण्यात आलेला आहे त्यामुळे शासनाने काढलेल्या कर्जमाफी शासन निर्णयामध्ये ८० ते ९० टक्के शेतकरी हे कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत याचा निषेध म्हणून शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने खांडे पारगाव येथे कर्जमाफी शासन निर्णयाची शेतकऱ्याच्या वतीने होळी करून जाहीर निषेध करण्यात आला व तात्काळ शासनाने कर्जमाफीच्या निर्णयामध्ये ◀◀ पान २ वर

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिजामाता महाविद्यालयांचा हरित संकल्प

## परिसंवाद, वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी आणि जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण जनजागृतीसाठी परिसंवाद व वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. निसर्गाकडून प्रेरणा : हवामानासाठी आणि आपल्या भविष्यासाठी या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.




कार्यक्रमाची सुरुवात सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगावचे प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. वरुणराज तौर यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने झाली. पृथ्वीच्या जखमांवर उपाय : हवामान कृती म्हणून वृक्षसंवर्धन या विषयावर बोलताना त्यांनी हवामान बदलाच्या वाढत्या संकटावर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन आणि नियोजनबद्ध वृक्षारोपणाचे महत्त्व विशद केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड ही सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला. परिसर हिरवागार करण्यासोबतच भावी पिढ्यांसाठी

# शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात!

बीड । प्रतिनिधी

आमदार विजयसिंहपंडित व नगराध्यक्ष श्रीमती प्रेमलता ताई पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी जालना रोड ते पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर पुतळा मार्गे सुभाष रोड (जिल्हा स्टेडियम परिसर) तसेच जिल्हा परिषद ते नगरपरिषद समोरील रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून खराब रस्त्यांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित व सुकर रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी ही कामे हाती घेण्यात आली आहेत. अशी



माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दिली.

नगर परिषदेची संपूर्ण टीम या कामांबाबत अत्यंत दक्ष राहून कामाची सुरुवात केली असून प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, ही आमची स्पष्ट भूमिका आहे.

याचबरोबर शहरातील उर्वरित मंजूर रस्त्यांची कामे देखील येत्या आठ दिवसांत टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार असून बीड शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला अधिक गती दिली जाणार आहे.

नागरिकांना एकच विनंती आहे की नव्याने जबाबदारी स्वीकारलेल्या या टीमला थोडा वेळ द्यावा. बीड शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे आणि पूर्ण क्षमतेने प्रयत्न करत आहोत. पूर्वी याच टीमने विरोधी पक्षात असताना देखील शहरातील अनेक रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने करून घेतली होती. आज हीच टीम सत्तेत असल्याने नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे, दर्जेदार विकासकामे करणे आणि शहराला अधिक सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध ◀◀ पान २ वर

# पर्यावरण दिनानिमित्त वडवणीत वृक्षारोपण संपन्न

## पर्यावरणाच्या समतोलासाठी वसुंधरेचे रक्षण गरजेचे -संजय आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता युवा मोर्चा, बीड जिल्हा यांच्या वतीने जिल्हाभर विविध मंडळांमध्ये वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनानुसार तसेच जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वडवणी तालुका भाजयुम ोच्या वतीने शुक्रवार, दि.५ जून २०२६ रोजी प्रमोद महाजन वसतिगृह, वडवणी येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण



वातावरणात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमात भाजपा व भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, शहराध्यक्ष अंकुश बारे यांच्यासह ईश्वर तांबडे, प्रेमदास राठोड, दिनेश नाईकवाडे, शिवाजी तौर, धनराज मुंडे, गणेश जाधव, राम नागवे, गोविंद मस्के, जानकीराम उजगरे, नवनाथ लंबाटे, नवनाथ तुरे, बाबुराव तवरे, अंगद बडे, राहुल टकले, गणेश टकले, गणेश कुरकुटे, नागू राठोड, ॲड. आडे, ॲड. सचिन आवचर, सखाराम आडे, सुनिल चव्हाण, सुनिल जाधव, अविनाश लवटे, अविनाश मुजमुले, गणेश बावधाने, शुभम जायभाये, बापू डोंगरे, किरण रेडेकर, बापू गोरे, विलास थोरात यांच्यासह भाजपा व भाजयुमोचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनाचे म हत्त्व विषद करत वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असमतोल यावर मात करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून ◀◀ पान २ वर

# संतांच्या संगतीत सुखाची प्राप्ती होते- नवनाथ बाबा

बीड । प्रतिनिधी

संगती जीवनात अतिशय महत्वाची आहे संगतीचा परिणाम मनुष्याच्या जीवनावर दुर्जनाच्या संगतीमध्ये मनुष्याच्या जीवनाचं अहित होतं, परंतु मनुष्याने नेहमीच साधू संतांची सेवा करावी,साधू संतांच्या संगती मध्ये मनुष्याला सुखाची प्राप्ती होते असे अभंग विवेचनामध्ये गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी भावना व्यक्त केले

संत हरकू बाबा महाराजांची जन्मभूमी असलेल्या अंथरवन पिंपरी येथे हरकूबाबा देवस्थान येथे नवनाथ बाबा महंत हरकुबाबा देवस्थान यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली



अखंड हरिनाम सप्ताह आयोजन करण्यात आले होते येथे पहिल्या दिवशी कीर्तन रुपी सेवा गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे होते

सुख या संतसमागमें । नित्य दुनावे तुझिया नामें । दहन होती सकळ कर्मे । सर्वकाळ प्रेमें डुलतसों ।।१।।

या अभंगाचे विवेचन करताना गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज पुढे म्हणाले की नामस्मरणाने जीवनातील पापाचा डोंगर नाहीसा ◀◀ पान २ वर

# देवस्थानांच्या खिदमत-माश व मदद-माश जमिनी खाजगी मालमत्ता कशा काय?

## विरासत अथवा मुतवली हे कामगारा सारखं प्रमाणपत्र; विरासत किंवा मुतवली प्रमाणपत्र म्हणजे देवस्थान मालकी नव्हे

बीड । प्रतिनिधी

देवस्थानांच्या जमिनींबाबत राज्यभरात चर्चा सुरू असताना एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पूजा-अर्चा, नित्यसेवा, दिवाबत्ती, नैवेद्य आणि धार्मिक विधींचा खर्च भागावा तसेच संबंधित सेवेकऱ्यांची उपजीविका चालावी या उद्देशाने पूर्वी संस्थान, राज्यकर्ते आणि शासनाकडून देण्यात आलेल्या खिदमत-माश व मदद-माश जमिनी आज खाजगी मालमत्ता असल्याप्रमाणे वापरल्या जात असल्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

इतिहास पाहिला तर अशा जमिनींचा उद्देश संबंधित व्यक्तीला वैयक्तिक संपत्ती निर्माण करून देणे नव्हता. उलट देवस्थानाची सेवा अखंड सुरू राहावी, दिवाबत्तीचा खर्च भागावा आणि सेवा करणाऱ्या व्यक्तीची उपजीविका चालावी यासाठी या जमिनी प्रदान करण्यात आल्या होत्या. त्यामुळे या जमिनींचा संबंध थेट धार्मिक सेवेशी होता.

विशेष म्हणजे वंशपरंपरेने सेवा करणाऱ्या व्यक्तींना देण्यात येणारे विरासत प्रमाणपत्र किंवा मुतवलीपद हे अनेकांच्या मते मालकी हक्काचे नव्हे तर सेवेचे प्रमाणपत्र आहे. एखाद्या देवस्थानात सेवा करण्याचा अधिकार आणि देवस्थानाच्या मालमत्तेवरील मालकी हक्क या दोन वेगळ्या बाबी आहेत. विरासत अथवा मुतवली म्हणून नाव नोंदले जाणे म्हणजे देवस्थानाचा मालक होणे नव्हे, असा मुद्दा उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, देवस्थानांच्या जमिनींचे वाढते बाजारमूल्य आणि वाढणारे उत्पन्न पाहता काही ठिकाणी पुजारी, जहागीरदार आणि संबंधित घटकांकडून या जमिनींवर मालकी हक्क सांगण्याचे प्रयत्न वाढल्याची चर्चा आहे. मात्र, जर एखादी जमीन मूळतः देवसेवा आणि सेवेकऱ्यांच्या उपजीविकेसाठी देण्यात आली असेल तर ती वैयक्तिक मालमत्ता म्हणून विक्रीयोग्य कशी ठरू शकते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यासोबतच आणखी काही गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. ज्या जमिनी सेवेकऱ्यांच्या उपजीविकेसाठी देण्यात आल्या, त्या विकून टाकल्यानंतर संबंधित व्यक्ती अथवा त्यांचे वारस पुन्हा देवस्थानाकडे मानधन, वेतन किंवा उत्पन्नातील हिस्सा मागू शकतात का? जर उपजीविकेचे साधन म्हणून दिलेली जमीनच विकली असेल, तर त्यानंतर पूजा-अर्चा, दिवाबत्ती आणि धार्मिक सेवांचा खर्च कोण उचलणार?

तज्ज्ञांच्या मते, जर मूळ सेवेकऱ्याने सेवा बंद केली किंवा नवीन सेवेकरी नियुक्त करावा लागला, तर त्याच्या ◀◀ पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26